## राज्यात सुमारे साडेअकरा लाख हेक्टरवर पेरण्या



**मुंबई** : राज्यातील विविध भागात मोसमी पाऊस सक्रिय झाला असून आतापर्यंत सुमारे ११.७० लाख हेक्टर शेतजमीनीवर पेरण्या झाल्या आहेत, अशी माहिती मंगळवारी (दि. १७) राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. पाऊस चांगला झाला असल्याने खतांची मागणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या खतांची उपलब्धता करून ठेवा. गरज भासल्यास आणखी मागणी करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. या वेळी राज्यातील पीक पाणी, खते आणि बियाणे पुरवठा यांच्याबाबत कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, राज्यातील जवळपास सर्वच भागात मोसमी पाऊस सक्रिय झाला आहे. यंदा आतापर्यंत ११.७० लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३३१
www.ramprahar.com

बुधवार, १८ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रोवर क्यूआर तिकिट प्रणाली/२

मृतदेह गुंडाळण्यासाठी पैसे घेणारा कामगार बडतर्फ/६

महिलांच्या वनडे क्रमवारीत स्मृती मानधना अग्रस्थानी/८


# शेतीसाठी महाअ‍ॅग्री-एआय धोरण

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध १० महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. १७) झाली. या बैठकीत १० निर्णय घेण्यात आले असून यात राज्यात महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता महाअ‍ॅग्री-एआय धोरण २०२५-२०२९ला मंजुरी देण्यात आली आहे. यासह आणीबाणीच्या काळात तुरूंगवास भोगलेल्या नागरिकांच्या मानधनात दुप्पट वाढ, अनिवासी भारतीयांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.



महाअ‍ॅग्री-एआय धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय प्रशासकीय संरचना असेल तसेच पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. एआय क्षेत्र वेगाने बदलणारे आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षात या धोरणामध्ये आवश्यक ते बदल, सुधारणा करण्यात येतील. त्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अ‍ॅग्रीटेक नाविन्यता केंद्र, कृषी विद्यापीठांतर्गत कृषी कृत्रिम बुद्धीमत्ता संशोधन व नाविन्यता केंद्र काम करतील.

**विरार-अलिबाग कॉरिडोरची उभारणी बीओटी तत्त्वावर करण्यास मान्यता**

विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची उभारणी बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा (बीओटी) तत्त्वावर करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

विरार ते अलिबाग कॉरिडोरच्या एकूण १२६.०६ किमी लांबीपैकी पालघर जिल्ह्यातील नवघर ते पेण तालुक्यातील बळवलीदरम्यान ९६.४१० किमीचे पहिल्या टप्प्यातील काम बीओटी तत्त्वावर करण्यात येईल. ही मार्गिका जेएनपीटी ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबई ट्रान्स हार्बर लिंकला जोडली जाणार आहे. याचबरोबर हा मार्ग मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग, कल्याण-मुरबाड-निर्मळ राष्ट्रीय महामार्ग, तळोजा बायपास मुंबई वडोदरा एक्स्प्रेस वे, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, पनवेल-उरण राष्ट्रीय महामार्ग आणि मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे.

**अनिवासी भारतीयांची मुले, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश**

राज्यातील खासगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना अनिवासी भारतीयांच्या मुलांना व पाल्यांना प्रवेश मिळावा याकरिता प्रवेश व शुल्क यांचे विनियमन अधिनियम २०१५मधील व्याख्येत सुधारणा करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

### मे. रायगड पेण ग्रोथ सेंटरला मुद्रांक शुल्कात सवलत

एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यात प्रकल्प जमिनीशी संबंधित करारावर लागणाऱ्या मुद्रांक शुल्कामध्ये ५० टक्क्यांची सवलत देण्यात येणार आहे.

पेण तालुक्यात स्थापन होणाऱ्या या ग्रोथ सेंटरचा समावेश नवीन शहर विकास प्राधिकरण क्षेत्रात होतो. या प्रकल्पाच्या माध्यमातून एमएमआरडीएने एकात्मिक वसाहत धोरणानुसार १२१७.७१ एकर जमीन विशेष उद्देश संस्थेच्या नावे नोंदविण्याचा प्रस्ताव दिला आहे. हा प्रकल्प प्रत्यक्षात आल्यास फिनटेक कंपन्या, शैक्षणिक व आरोग्य सुविधा, करमणूक उद्याने, परवडणाऱ्या घरे, व्यावसायिक हब, किरकोळ विक्री आणि बांधकाम क्षेत्राचा विकास होईल. त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

## आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुपटीने वाढ; हयात जोडीदारालाही मिळणार मानधन

सन १९७५ ते १९७७मधील आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देताना कारावास भोगावा लागलेल्यांना आता वाढीव मानधन मिळणार आहे तसेच मानधनधारकाच्या हयात जोडीदारालाही मानधन देण्याचा आणि अन्य काही अटी शिथिल करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्यांना दरमहा २० हजार रुपये व त्यांच्या पश्चात पत्नीस किंवा पतीस दरमहा १० हजार रुपये मानधन देण्यात येईल. एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना दरमहा १० हजार रुपये, तर त्यांच्या पश्चात पत्नीस किंवा पतीस पाच हजार रुपये मानधन देण्यात येईल. हयात असलेल्या जोडीदारास मानधनासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी यापूर्वी अटकेच्या वेळी किमान वय १८ असणे आवश्यक होते. ही अट रद्द करण्यात आली आहे.

# हवाई सुंदरी मैथिली पाटीलला साश्रुनयनांनी अखेरचा निरोप

## शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



अहमदाबाद येथे नुकत्याच झालेल्या भीषण विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेली पनवेल तालुक्यातील न्हावा गावची सुकन्या, हवाई सुंदरी मैथिली पाटील हिच्या पार्थिवावर मंगळवारी (दि. १७) शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह ग्रामस्थांनी मैथिलीला श्रद्धांजली वाहिली. कृष्णभक्त मैथिलीला 'राधे राधे' असा आवाज देत अखेरचा निरोप देण्यात आला.

१२ जून रोजी अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाला होता, ज्यात सुमारे पावणेदोनशे जणांचा दुर्दैवी अंत झाला. या मृतांमध्ये मैथिली पाटीलचाही समावेश होता. ती गेल्या दोन वर्षांपासून एअर इंडियामध्ये हवाई सुंदरी म्हणून कार्यरत होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत तिने आपले स्वप्न पूर्ण केले होते. तिच्या यशाने अनेकांना प्रेरणा मिळाली होती. **(पान २ वर..)**

## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी वाहिली श्रद्धांजली



मैथिली पाटील हिचा अपघाती मृत्यू ही केवळ तिच्या कुटुंबीयांसाठीच नव्हे, तर संपूर्ण गावासाठी आणि हवाईसेवेतील तिच्या सहकाऱ्यांसाठीही दुःखद घटना आहे. ग्रामीण भागातून संघर्ष करत कष्टाच्या जोरावर हवाई सुंदरी होण्याचे स्वप्न तिने पूर्ण करणे प्रेरणादायी होते. संकटांशी झुंज देत आकाशाला गवसणी घालणारी मैथिली आज आपल्यात नाही यावर विश्वास बसत नाही. तिचे तेजस्वी हास्य, संघर्षमय आयुष्य आणि यशोगाथा कायम आठवणीत जिवंत राहील. सर्व ग्रामस्थ आणि आम्ही मैथिलीच्या कुटुंबाच्या पाठीशी राहू, अशी प्रतिक्रिया आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी श्रद्धांजली अर्पण करताना व्यक्त केली.

## निवडक

### एअर इंडियाच्या तीन विमानांचे उड्डाण तांत्रिक बिघाडामुळे रद्द

**नवी दिल्ली** : अहमदाबाद येथे १२ जून रोजी विमानाला भीषण अपघात झाल्यानंतरही एअर इंडियाच्या अडचणी संपलेल्या नाहीत. मंगळवारी (दि. १७) दिवसभरात विविध शहरांमधून एअर इंडियाच्या तीन विमानांचे आंतरराष्ट्रीय उड्डाण तांत्रिक बिघाडामुळे रद्द करण्यात आले. सर्वात आधी सकाळी अहमदाबादहून लंडनला जाणारे विमान रद्द झाले. त्यानंतर अमृतसरहून लंडनला जाणारे विमान रद्द करण्यात आले, तर दिल्लीहून पॅरिसला जाणारे विमानही रद्द करण्यात आले.

### बेटिंग अ‍ॅप्स प्रचारप्रकरणी अभिनेते, क्रिकेटपटूंची चौकशी

**मुंबई** : सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बेकायदेशीर ऑनलाईन बेटिंग अ‍ॅप्स प्रसारप्रकरणी अभिनेता सोनू सूद, अभिनेत्री उर्वशी रौतेला यांची चौकशी केली. यामध्ये क्रिकेटपटू हरभजन सिंग, सुरेश रैना, युवराज सिंगचे नावदेखील समोर आले असून त्यांचीदेखील चौकशी झाली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले काही सेलिब्रेटींना आधीच नोटीस जारी करण्यात आली आहे, तर अन्य सेलेब्सना लवकरच नोटीस जारी होऊ शकते.

## 'उबाठा' नेते सुधाकर बडगुजरांसह घोलप, मुर्तडक भाजपमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

नाशिकमधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते सुधाकर बडगुजर यांनी मंगळवारी (दि. १७) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या वेळी बडगुजर यांच्यासह माजी मंत्री बबनराव घोलप, माजी महापौर अशोक मुर्तडक यांनीही 'कमळ' हाती घेतले.

मुंबई भाजप कार्यालयात मंत्री तथा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये पक्षप्रवेश झाला.

या वेळी बोलताना सुधाकर बडगुजर यांनी, मी कोविड काळातदेखील काम केले. असे असूनही ज्या पक्षाने माझा अनादर केला, त्या पक्षाला मी सांगू इच्छितो की, महापालिकेच्या निवडणुकीत 'दूध का दूध पानी का पानी' होईल, असा टोला ठाकरे गटाला लगावला.

या वेळी बडगुजर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुकही केले. दूरदृष्टी असणारा नेता आज मुख्यमंत्रिपदावर आहे. त्यांच्या नेतृत्वात मी काम करणार आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे जी जबाबदारी देतील ती पूर्ण करेन, असेही ते म्हणाले.



# कळंबोलीत आरोग्य शिबिर, विद्यार्थी गुणगौरव

## मान्यवरांकडून अमर पाटील यांचे अभीष्टचिंतन





**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भाजपचे कळंबोली मंडळ अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांचा वाढदिवस सोमवारी (दि. १६) विविध सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा झाला. वाढदिवसानिमित्त कळंबोलीमध्ये तीन ठिकाणी मोफत आरोग्य शिबिर तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

सुएसोच्या कळंबोली येथील शाळा सभागृहात झालेल्या विद्यार्थी गुणगौरव आणि अभीष्टचिंतन कार्यक्रमात बोलताना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, तरुण, तडफदार नेतृत्व असलेले अमर पाटील यांनी मिळालेली प्रत्येक संधी सिद्ध करून दाखवली, असे गौरवोद्गार काढले; तर आमदार प्रशांत ठाकूर यांनीही अमर पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत कळंबोलीवासीयांच्या विकासाची संकल्पना प्रत्यक्षात यावी या दृष्टिकोनातून भाजप कार्यरत आहे, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, गणेश कडू, प्रमिला पाटील, मोनिका महानवर, कामोठे मंडळ शहराध्यक्ष विकास घरत, माजी अध्यक्ष रवींद्र जोशी, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, कळंबोली मंडळ माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भटके विमुक्त आघाडी जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, रमेश मुंडे, धनश्याम शर्मा, गौरव नाईक, कृष्णा गर्जे, सरचिटणीस दिलीप बिष्ट, सुनील ठोंबरे, अमर ठाकूर, केशव यादव, विनोद बोरसे, विष्णू गायकवाड, निलेश भोईर, माजी जि.प. सभापती प्रिया मुकादम, सरस्वती काथारा, शुभांगी निर्मले, सुनिता हिरवळे, पालवे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# भोकरपाडा, भानघर येथे अंगणवाड्यांचे उद्घाटन

## कार्यकर्त्यांनी गावची विकासकामे मार्गी लावावीत -भाजप नेते अरुणशेठ भगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भोकरपाडा आणि भानघर येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन निधीमधून अंगणवाडी बांधण्यात आली आहे. या अंगणवाड्यांचे उद्घाटन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १७) झाले. या वेळी बोलताना त्यांनी, कार्यकर्त्यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून आपल्या गावची विकासकामे मार्गी लावावीत, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाला भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजीत पाटील, रमेश पाटील, माजी सरपंच शांताराम पोपेटा, अलका तांडेल, नितीन पोपेटा, माजी उपसरपंच रोशन पोपेटा, गाव कमिटी अध्यक्ष नारायण माळी, उपाध्यक्ष मदन मढवी, सदस्य रघुनाथ मोहिते, सुनील मढवी, भरत तांडेल, सागर मढवी, गोटीराम चाहू फुलोरे, अशोक बबन फुलोरे, भास्कर फुलोरे, गणेश फुलोरे, हनुमान फुलोरे, लहू फुलोरे, हरिदास फुलोरे, रमेश फुलोरे, गजानन फुलोरे, सखाराम फुलोरे, रूपेश फुलोरे, कल्पेश फुलोरे, बळीराम फुलोरे, काशिनाथ फुलोरे, साजन फुलोरे, निखिल ठाकूर, आनंद फुलोरे, अनिकेत फुलोरे, हरिभाऊ म्हात्रे, दशरथ फुलोरे, दीपक फुलोरे, संजय फुलोरे, सुनील फुलोरे, संकेत फुलोरे, निकेतन फुलोरे, अभिजीत फुलोरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान, या वेळी युवा नेते रोशन पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांना सर्वांनी शुभेच्छा दिल्या.





# महाड-भोर मार्ग वाहतुकीसाठी बंद

## संभाव्य दरडजन्य स्थितीमुळे प्रशासनाचा निर्णय

**महाड : प्रतिनिधी**

रायगड आणि पुणे जिल्ह्याला वरंध घाटमार्गे जोडणारा महाड-भोर महामार्ग पावसाळ्यातील चार महिने वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. दरड कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

महाड-भोर महामार्गावर वरंध घाट तसेच पुणे जिल्हा हद्दीत रस्ता रूंदीकरणाचे काम मागील तीन वर्षांपासून चालू आहे. या मार्गावर सातत्याने दरडी कोसळण्याचे प्रकार घडत असतात. त्यातच महाड हद्दीतील पारमाची, माझेरी गावाजवळ रस्तादेखील खचला आहे. २०२१मध्ये या ठिकाणी रस्ता वाहून गेला होता. नैसर्गिक दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने पावसाळ्यात हा मार्ग बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

पुणे जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या परिपत्रकानुसार राष्ट्रीय महामार्ग ९६५, डी.डी. राजेवाडी ते वरंध-भोर-महाड हा पावसाळ्यातील चार महिने वाहतुकीकरिता बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. रायगड आणि पुणे जिल्हा हद्दीतील रूंदीकरणाच्या कामामध्ये अनेक ठिकाणी दरडप्रवण क्षेत्र असल्याने संभाव्य नैसर्गिक दुर्घटना व जीवित हानी टाळण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.

पावसाळ्याच्या कालावधीत हवामान खात्याने रेड, ऑरेंज अलर्ट दिला नसल्यास घाटरस्ता हलक्या वाहनांच्या वाहतुकीसाठी खुला ठेवणे योग्य राहील, असेदेखील परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, या रस्त्यावरून जाणारी वाहतूक बंदी कालावधीत पर्यायी मार्ग म्हणून पुण्याकडे जाण्यासाठी माणगाव, निजामपूर, ताम्हणी घाट, मुळशी, पिरंगुट, पुणे; तर कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा, पोलादपूर, महाबळेश्वर, वाई, सुरूर, सातारा, कराड कोल्हापूर अथवा राजेवाडी फाटा, पोलादपूर, खेड, चिपळूण, पाटण, कराड, कोल्हापूर अशी वळवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# कोकण विभागातील खारभूमी योजनांची कामे तातडीने पूर्ण करा -मंत्री भरत गोगावले

**मुंबइ : प्रतिनिधी**

कोकण विभागात भरती–ओहोटी व चक्रीवादळांमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून, विविध योजनांच्या लाभक्षेत्रातील पिकाखालील क्षेत्र नापिक होणे, गोड्या पाण्याचे स्त्रोत भरतीच्या पाण्यामुळे क्षारयुक्त होणे, तसेच लाभक्षेत्रातील गावांना भरती व पुराचा धोका निर्माण होणे आदी समस्या उद्भवत आहेत. त्यामुळे बृहत आराखड्यातील नवीन योजनांची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिले.

रोजगार हमी योजनेसंदर्भात मंत्री श्री. गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस आमदार किरण सामंत शेखर निकम, वित्त विभागाचे सहसचिव विजय शिंदे, कोकण विभागाचे मुख्य अभियंता मिलिंद नाईक, जलसंपदा विभागाचे उपसचिव रोशन हटवार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री गोगावले म्हणाले, सद्यः स्थितीत राज्य निधी अंतर्गत उपलब्ध निधीतून खारभूमी योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. तथापि, नुकसानीस तोंड देणाऱ्या आणि भविष्यकालीन धोके लक्षात घेता नव्या खारभूमी योजनांची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेणे अत्यावश्यक आहे. यासाठी केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन निधीतून साहाय्य मिळणे गरजेचे आहे. या निधीतून कोकण विभागातील ६६ खारभूमी योजनांची कामे हाती घेता येतील. यासाठी सुमारे ४४२.७९ कोटी रुपयांचा निधी आवश्यक असून, या योजनांमुळे अंदाजे ६,९२० हेक्टर क्षेत्र पुनःप्राप्त होणार आहे. या कामांना अधिक गती देण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.



## विवाहित महिला बेपत्ता

**महाड : प्रतिनिधी**

आईकडे जाते सांगून सासरहून निघालेली विवाहित महिला शोध घेऊनही न सापडल्याने अखेर तिच्या पतीने पोलीस ठाण्यात धाव घेऊन पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे.



याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार दिपाली दिनेश शिंदे वय ४२,रा.साकडी, महाड, ही विवाहित महिला मंगळवार दिनांक १०जून रोजी सकाळी ११ च्या सुमारास कोंढवा, जिल्हा पुणे याठिकाणी आपल्या आईकडे जात असल्याचे सांगून घराबाहेर पडली होती. घरातून गेल्यापासून सदर महिलेचा संपर्क होत नसल्याने आणि नातेवाई कांसह इतर सर्वत्र शोधाशोध करूनही ती न सापडल्याने अखेर तिचे पती दिनेश पांडुरंग शिंदे यांनी सोमवार १६ जून रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन पत्नी बेपत्ता झाल्याची रितसर तक्रार नोंदवली आहे.

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली या महिलेचा शोध सुरू असून ही महिला कोणास आढळून आल्यास पोलिसांशी ९४२३३८००६३ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन एमआयडीसी पोलिसांमार्फत करण्यात आले आहे.

## उतेखोल जि.प. शाळेत विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ ची सुरुवात दि. १६ जून २०२५ रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा उतेखोल मध्ये मोठ्या उत्साहाने व आनंददायी वातावरणामध्ये झाली. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्यामार्फत शाळा प्रवेशोत्सव २०२५ –२०२६ च्या आदेशानुसार शाळेमध्ये इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा लेझीमच्या संगितात आणि दिंडी काढून करण्याल आला. शाळेच्या प्रांगणात आल्यावर विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या मुलांचे पहिले





पाऊल कुंकवाच्या साहाय्याने संस्मरणीय करण्यात आले. विद्यार्थ्यांना फुगे व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संजय सुर्यवंशी उपअभियंता बांधकाम विभाग माणगाव, माणगाव नरपंचायतीचे नगरसेवक अजित तार्लेकर, सचिन बोंबले,साधनव्यक्ती सुप्रिया अंबुर्ले, अंगणवाडी सेविका धनश्री देशमुख, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रतिक्षा घोणे, उपाध्यक्ष दिनेश पोवार तसेच शा. व्य. समितीचे सदस्य दिपिका कापडे, रुपाली भिलारे, नंदिनी वाढवळ आणि पालक वर्ग आदी उपस्थित होते.

विद्येची आराध्य देवता सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली अंबुर्ले,उपशिक्षिका अस्मिता खडतर यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना फुल, खाऊ, पेन्सिल, फुगे देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठयपुस्तक, बुट आणि पायमोजे यांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पोषणाआहारात श्रीखंड पुरी असा गोड स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला.

आलेल्या मान्यवर पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शाळेचे कौतुक केले व नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या उपशिक्षिका सौ. अस्मिता खडतर यांनी उपस्थितांचे आभार मानले व प्रवेशोत्स्व २०२५–२०२६ कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## चणेरा भागातून दोन मुलांसह विवाहित महिला बेपत्ता

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहे तालुक्यातील चणेरा भागातील खुटल येथील विट्भट्टी वर काम करणारी २५ वर्षीय विवाहित महिला आपल्या १० व ७ वर्षाचे दोन लहान मुलांसोबत बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. या बाबत पती दीपक चंदर वाघमारे याने रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार दीपक चंदर वाघमारे हा मूळचा राहणार मुरुड तालुक्यातील शीघ्रे नवीनवाडी येथील रहिवाशी असून तो आपल्या बायको व दोन मुलांसोबत रोहे तालुक्यातील







चणेरा विभागातील खुटल येथील एका विटभट्टीवर मोलमजुरी म्हणून काम करत असे. दि.१३ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२ वा. च्या सुमारास खुटल येथून राहत्या घरातून पत्नी राजेशी वाघमारे ( वय २५), विघ्नेश दीपक वाघमारे ( वय १० वर्ष ), योगेश दीपक वाघमारे ( वय ७ वर्ष) हे तिघेजण बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे.

दोन मुलांसोबत गेली ४ महिने पत्नी बेपत्ता असल्याची खबर रोहा पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एन एन मोरे पुढील तपास करित आहेत.

## सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो लाईन १वर क्यूआर आधारित तिकीट प्रणाली

**नवी मुंबई : रामाप्रहर वृत्त**

कॉमन मोबिलिटी सोल्युशनच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत, सिडकोने दिनांक १७ जून २०२५ रोजीनवी मुंबई मेट्रो लाईन १ वर पेपर क्यू आर (ठ) तिकीट प्रणाली यशस्वीपणे सुरू केली आहे. ही नाविन्यपूर्ण तिकीट प्रणाली ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन (–ऋउ) प्रणालीचे अद्ययावतीकरण करून साकारण्यात आली आहे, जे नव्या गरजांना पूरक आहे.

या प्रणालीचे उद्घाटन सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक, शान्तनु गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संतोष ओंभासे, अधीक्षक अभियंता, सिडको, श्री. मिलींद रावराणे, महाव्यवस्थापक (ऑपरेशन व मेंटेनेन्स), श्री. हरीश गुप्ता, कार्यकारी संचालक, महामेट्रो व अन्य अधिकारी उपस्थित होते. क्यू आर आधारित तिकीट प्रणालीची आज बेलापूर मेट्रो स्थानकावर अधिकृतपणे सुरुवात करण्यातआली.

या उपक्रमाचा उद्देश प्रवाशांना जलद, सुलभ व सुरळीत प्रवास अनुभव प्रदान करणे हा आहे. प्रवाशांचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी सिडकोतर्फे भविष्यात लवकरच आणखीन काही



नवीन सुविधादेखील समाविष्ट केल्या जाणार आहेत. यामध्ये मोबाईल तिकीटिंग अ‍ॅपचा समावेश आहे.

या अ‍ॅपच्या माध्यमातून भविष्यात प्रवाशांना मेट्रोची तिकीटे खरेदी करता येतील. आगामी व्हॉट्सप आधारित तिकीट सेवेच्या माध्यमातून प्रवाशांना थेट व्हॉट्सपद्वारे तिकीटे खरेदी करता येतील. तर नॅशनल कॉमन मोबिलिटीकार्ड (NCMC) च्या माध्यमातून भविष्यात एकसंध पेमेंट सोल्युशन अंतर्गत विविध वाहतूक सेवा एकत्रितपणेवापरता येऊ शकतील. या सर्व सुविधा लवकरच नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहेत.ही क्यू आर आधारित तिकीट प्रणाली मेसर्स औरियनप्रो सोल्युशन्स प्रा. लि. यांनी तयार केली असून,सिडको आणि महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्या देखरेखीखाली यशस्वीपणे कार्यान्वित करण्यात आली आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाचे २१ जूनला आयोजन

**रायगड : प्रतिनिधी**

शारीरिक आणि अध्यात्मिक विकासासाठी योगाचे महत्त्व विचारात घेऊन प्रतीवर्षी संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. त्यानुषंगाने दि.२१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमास जिल्हा प्रशासनांतर्गत असलेले सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, नामांकित खेळाडू आणि लोकप्रतिनिधींनी उपस्थित राहून मोठ्या प्रमाणात योग दिन साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यातसंदर्भात (दि.१६ जून) रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे



बैठक संपन्न झाली. यावेळी शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, जिल्हा युवा अधिकारी अमित फुंडे, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यासमन्वयाने दि.२१ जून २०२५ हा दहावा आतरराष्ट्रीय योग दिन जिल्हा क्रीडा संकुल, नेहूली येथील प्रशस्त बॅडमिंटन हॉलमध्ये साजरा केला जाणार आहे. योगविषयक प्रचार व प्रसार करण्यासाठी या दिनाचे महत्त्व विचारात घेऊन चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## आषाढी एकादशीच्या महापूजेचे मुख्यमंत्री फडणवीसांना निमंत्रण

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने निमंत्रण देण्यात आले.

यंदाच्या आषाढी एकादशी दिवशी रविवार, दि. ६ जुलै, रोजी पहाटे २.२० वाजता मुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल–रुक्मिणीमातेची शासकीय महापूजा करण्यात येईल. या महापूजेचे निमंत्रण देण्यासाठी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज–औसेकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची वर्षा निवासस्थान येथे सदिच्छा भेट घेतली.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांचा मंदिर समितीच्या वतीने विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, उपरणे, चिपळ्या देऊन



सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, अ‍ॅड. माधवी निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

मंदिर समितीमार्फत आषाढी यात्रेच्या नियोजनाची तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन कामाची तसेच विठ्ठल रुक्मिणी मातेचे जलद व सुलभ दर्शन होण्याच्या दृष्टीने राबवण्यात आलेल्या टोकन दर्शन प्रणालीची तसेच अन्य व्यवस्थेबाबत माहिती देण्यात आली.

पान १ वरून

### हवाई सुंदरी मैथिली पाटीलला साश्रुनयनांनी अखेरचा निरोप

डीएनए निश्चितीनंतर मैथिलीचे पार्थिव कुटुंबियांकडे सोपविण्यात आले. त्यानंतर मंगळवारी सकाळी न्हावा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मैथिलीला निरोप देताना उपस्थितांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा येत होत्या. या दुर्दैवी घटनेमुळे मैथिलीच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गाव तिच्या आठवणीत हळहळ व्यक्त करत आहे.

### कळंबोलीत आरोग्य शिबिर, विद्यार्थी गुणगौरव

या वेळी दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उज्वल यश संपादित केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शिवशंभो सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल तालुका महसूल विभागामार्फत काही दिवसांपूर्वी घेण्यात आलेल्या दाखले शिबिरातील लाभार्थ्यांना दाखल्यांचे वाटप करण्यात आले. उपस्थितांनी अमर पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.






पोलादपूर : कुडपण खुर्द येथील गॅबियन स्ट्रक्चरजवळील डोंगरातून रस्त्यावर दरड कोसळली. या ठिकाणी लाल माती आणि दगडांचा ढिगारा डोंगरातून खाली आलेला दिसून येत आहे. (छाया : शैलेश पालकर)

## निवडक

### खुनाची भीती दाखवून ज्येष्ठाची लूट

**पनवेल :** खारघरमध्ये खुनाची भीती दाखवून ज्येष्ठ नागरिकाला लुटल्याची घटना सेक्टर १४ येथील मशीद मार्गाजवळ घडली आहे. या घटनेत ज्येष्ठ नागरिकाच्या अंगावरील सोनसाखळी आणि अंगठी भामट्यांनी लांबवली आहे. खारघर बसाहतीमध्ये एकट्या ज्येष्ठ नागरिकांना हेरून त्यांना गुन्हेगारांची भीती दाखवून लुटणारी दुकली फिरत आहे.

### प्रवासात दागिन्यांची झाली चोरी

**पनवेल :** खासगी वाहनाने महाड ते पनवेल असा प्रवास करणाऱ्या महिलेच्या बागेतून, तीन अनोळखी व्यक्तींनी सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना घडली आहे. याबाबत पनवेल शहर पोलिस ठाण्यात तक्रार नोंद करण्यात आली आहे. प्रीती जगताप या खासगी वाहनातून महाड ते पनवेल असा प्रवास करत होत्या. पनवेलला उतरल्यावर प्रीती यांनी बॅग तपासली असता त्यांना सोन्याचे दागिने आढळून आले नाही. त्यामुळे दागिन्यांची चोरी झाल्याची लक्षात येताच प्रीती यांनी पनवेल शहर पोलिस ठाणे गाठून सोन्याचे मंगळसूत्र, नेकलेस, लक्ष्मीहार, चैन, कानातील साखळी, वेल, दोन सोन्याच्या अंगठ्या, वाळे, कमरेची साखळी, कडा, व घड्याळ असा एकूण तीन लाख ८० हजार रुपयांचा एवज चोरी केला.

### गरजू विद्यार्थ्यांना दप्तराचे वाटप



**पनवेल :** पत्रकार मित्र असोसिएशनचे कायदेशीर सल्लागार ॲड. मनोहर सचदेव यांनी आपला वाढदिवस सामाजिक कार्यक्रम करून साजरा केला. या वेळी पत्रकार मित्र असोसिएशनचे कायदेशीर सल्लागार व श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. मनोहर सचदेव यांनी अत्यंत गरजू मुलांना शालेय दप्तर व वह्यांचे वाटप पूज्यसिंधी पंचायत सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. या वेळी पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे केक कापून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमास पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष केवल महाडिक, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, पत्रकार संदीप मुळीक, पत्रकार डॉन के. के., समाजसेवक रवींद्र पाटील, अल्पेश खंडागळे, अनुराग वाघचौरे यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# सराईत दोन चोरटे जेरबंद

**चार गुन्हे उघडकीस**

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरासह खांदेश्वर परिसरात मोटर सायकल चोरी व जबरी चोरी करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना खांदेश्वर पोलिसांनी जेरबंद केले असून त्यांच्याकडून चार गुन्हे उघडकीस आणले आहेत.



परिमंडळ २ मधील नवीन पनवेल, पनवेल या भागांमधुन मागील बऱ्याच दिवसांपासुन मोटरसायकल व जबरीने सोन्याच्या चेन चोरीच्या घटना वारंवार घडत होत्या. मोटारवाहन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झालेली होती. पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांनी वारंवार गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या मिटींग घेऊन मोटारवाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या होत्या.

खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत मोटरसायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार खांदेश्वर पोलिसांच्या पथकांने सर्व मोटरसायकल चोरीच्या घटनास्थळांवरील तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील चैन स्नॅचिंगच्या घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज एकत्रित करून त्याचा सखोल अभ्यास केला. यामध्ये रेकॉर्डवरील आरोपी निष्पन्न केले. त्यानुसार पंचशील नगर झोपडपट्टी परिसरात सापळा लावुन आरोपी आकाश गोपाळ गाडे (वय २३, रा. विचुंबे) व सुरज मारूती देवरे (वय २२, रा. नवीन पनवेल) यांना ताब्यात घेतले. त्यांनी मोटारसायकल चोरी व चैन स्नॅचिंग करत असल्याचे कबुल केले. आरोपींनी चोरी केलेल्या गाड्या बेवारस स्थितीत सोडुन दिल्या असल्याचे सांगितले.

नमुद आरोपींना अटक करुन त्यांच्याकडुन आतापर्यंत एकुण तीन मोटरसायकल व ३० ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या चैन असा एकुण २,३५,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून चार गुन्हे उघडकीस आणण्यात खांदेश्वर पोलिसांना यश प्राप्त झाले आहे. अटक आरोपींकडे अद्याप तपास चालु आहे.

## महिलेच्या सव्वा दोन लाखांच्या दागिन्यांची लूट

**पनवेल : वार्ताहर**

चेन स्नॅचींग करणाऱ्या लुटारूंनी कुटुंबियासह रस्त्याने पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील तब्बल दोन लाख २० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि चेन लुटून नेल्याची घटना खारघरमध्ये घडली.

घटनेतील तक्रारदार पार्थीबन चंद्रशेखर (वय ३२) खारघर, सेक्टर-३५ मध्ये कुटुंबासह राहण्यास आहे. पार्थीबन पत्नी, मुलगा आणि आई कालीश्वरी (वय ५५) या सर्वांना घेऊन नाष्टा करण्यासाठी जात होता. ते सेक्टर-३५ ई मधील स्टेटस् विहार सोसायटीसमोर आले होते. या वेळी पार्थीबन काही अंतर पुढे चालत असताना, पाठीमागून मोटरसायकलवरून आलेल्या दोघा लुटारुंपैकी एकाने पार्थीबेन याच्या आईच्या गळ्यातील एक लाख ८० हजार रुपयांचे मंगळसूत्र आणि ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन खेचली. त्यानंतर दोघा लुटारुंनी पलायन केले.

या वेळी आई कालीश्वरी यांनी आरडा-ओरड केल्यानंतर पार्थीबेन याने सदर लुटारुंचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, मात्र दोघे लुटारु मोटरसायकलवरून साई आयकोंन बिल्डींगच्या दिशेने पसार झाले. या घटनेनंतर त्यांनी खारघर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

## शिवकरमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संपूर्ण महाराष्ट्रात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात सोमवारी मोठ्या उत्साहात झाली. राज्यभरात सर्वत्र सरकारी शाळांमध्ये मशाळा प्रवेशोत्सव साजरा होत आहे. याच पार्श्वभूमीवर, पनवेल तालुक्यातील शिवकर गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये आमदार विक्रांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रथमच शाळेत प्रवेश करणाऱ्या लहान विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.



या वेळी आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पाठ्यपुस्तके, साहित्य आणि गणवेश वाटप करण्यात आले. तसेच शाळेची इमारत, शिक्षण आणि सुविधांची पाहणी करून शाळेच्या विकास आराखड्याची माहिती घेतली. त्यांनी अधिकाऱ्यांना सुसज्ज आणि प्रशस्त इमारतीबाबत आवश्यक सूचना दिल्या.

या कार्यक्रमाला शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, उपसरपंच रवींद्र ढवळे, पंचायत समिती शिक्षण अधीक्षक नवनाथ साबळे, शिक्षणाधिकारी निंबाजी गीते, मुख्याध्यापिका सुनीता भोईर यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, विविध मान्यवर आणि शासकीय अधिकारी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये बुद्धिजीवी प्रभावी व्यक्तिमत्व संमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अकरा वर्षांत भारताने सर्वच क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार विक्रांत पाटील यांच्या संयोजनातून पनवेलमध्येमध्ये बुद्धिजीवी प्रभावी व्यक्तिमत्त्व संमेलन आयोजित करण्यात आले होते. हे संमेलन भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश महामंत्री माधवी नाईक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात झाले.



या संमेलनात भारताने गेल्या अकरा वर्षांत घेतलेली विकासाची वाट आणि पुढील दिशा यावर सखोल चर्चा झाली. उपस्थित मान्यवरांनी या काळात झालेल्या बदलांचा आढावा घेतला आणि भविष्यातील अपेक्षा, संधी व जबाबदाऱ्या यावर आपले विचार मांडले. देशाच्या प्रगतीमध्ये प्रत्येक जबाबदार नागरिकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे या वेळी ठामपणे व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा चिटणीस भाजप ब्रिजेश पटेल, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, पनवेलमधील प्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, हरेश केणी, सिद्धार्थ बांठीया, गौरव जोशी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



**पनवेल : भारतीय मजदुर संघ पोर्ट अँड डॉक महासंघाचे अखिल भारतीय त्रिवार्षिक अधिवेशन १ व २ मार्च रोजी पारादीप पोर्ट, ओडिशा येथे झाले होते. या वेळी वेतन करार आणि कार्यकारिणी समिती बैठकीच्या क्षणचित्रांची पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. ती पुस्तिका माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना देण्यात आली. या वेळी भारतीय पोर्ट अँड डॉक महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील, विश्वनाथ कोळी, नुरा शेख आदी उपस्थित होते.**



**पनवेल : उलवे येथील भाजपचे युवा नेते उदय पांडे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी कामगार नेते सुरेश पाटील, माजी उपसरपंच अमर म्हात्रे, संकल्प घरत, अवधेश महतो, अमित नाईक, अवनीश सिंग, कपिल यादव, आर.सी. पिल्लई, अजय हेगडेकर, उत्तम चिकने, गोपी भोईर आदी उपस्थित होते.**

## संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे हळदीकुंकू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या सुका कचरा व्यवस्थापनाचा ताण हा सर्व सजीव सृष्टीवर घातक परिणाम करत आहे. त्यामुळे या जटिल प्रश्नावर संस्थेच्या वतीने सुटसुटीत मार्ग शोधून काढला आहे. संवेदना संस्थेच्या वतीने ऑक्टोबर २०२४पासून सुका कचरा वर्गिकरण प्रणाली हाती घेतली आहे. पनवेलमधील अनेक सोसायट्यामधून २५० घरे यामध्ये सहभागी झाली आहेत. त्यातील एक म्हणजेच पुष्पनारायण सोसायटी देवत ही होय. या सोसायटीमधून १०५ घरे संवेदना संस्थेकडे आपल्या घरातील कचरा वर्गिकरण करून देतात. म्हणून या सोसायटीतील महिलांसाठी कौतुकसोहळा म्हणून पर्यावरण पूरक हळदीकुंकू कार्यक्रम १५ जून २०२५ रोजी साजरा करण्यात आला.

चाळीस महिलांनी या वेळी आपला सहभाग नोंदवला. तसेच अनेक महिलांनी आपले या बाबतचे सकारात्मक अनुभव सांगितले. अनेक सोसायट्या, संस्था, राजकीय पक्ष हा दिवस झाडे लावून साजरा करताना दिसतात, परंतु इतर पर्यावरण विषयक गंभीर समस्या हाताळताना हे पर्यावरण रक्षक कुठे असतात हा संशोधनाचा विषय ठरावा.

जी निसर्गदेवता आपले रक्षण करत असते तिचे आपण सदैव ऋणी असले पाहिजे ही भावना जागृत करणे आपल्यात कृतज्ञता भाव निर्माण करणे आणि तिची सेवा करणे या उद्देशाने संवेदना संस्थेने यावर्षी मात्र एक वेगळा पायंडा पाडून पर्यावरणपूरक हळदीकुंकू साजरे केले.

या वेळी भरपूर प्रणवायू देणारे तूळशीचे रोप देऊन उपस्थिती असणाऱ्या महिलांचे कौतुक करण्यात आले. कचरा ही एक गंभीर समस्या आहे आणि या समस्याचे निर्मूलन करायचे झाल्यास शहर-खेड्यात एक मोठी चळवळ उभी करावी लागेल. तेव्हा सर्वांनी ही गंभीर समस्या आहे हे लक्षात घेऊन यात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी केले आहे.



## उरण नगर परिषद कन्याशाळेत प्रवेशोत्सव

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषद कन्याशाळा क्र.२ मध्ये शाळा प्रवेशोत्सव व पहिले पाऊल हे उपक्रम अतिशय आनंदाने व उत्साहाने साजरे करण्यात आले.

सर्वप्रथम शिक्षक, विद्यार्थी, पालक व एसएमसी सदस्य यांनी शालेय परिसरात विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढली. तद्नंतर शाळेत विद्यार्थी, पालक, एसएमसी सदस्य व सर्व शिक्षकांची सभा घेण्यात आली. यामध्ये नवागतांचे औक्षण करून व गुलाबपुष्प, चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक, गणवेश, टाय, पट्टा, बूट व सॉक्स यांचे तसेच विश्वजीत बाळकृष्ण पाटील यांनी विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या वह्या, दप्तर, पाटया या शैक्षणिक साहित्याचे उरण नगर परिषद शिक्षण विभागाच्या प्रशासनाधिकारी संगीता माने यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस असल्याने विद्यार्थ्यांना गौड जेवण देण्यात आले. या वेळी उरण नगर परिषदेच्या शिक्षण विभागाच्या प्रशासनाधिकारी संगीता माने उपस्थित होत्या. तसेच पालक, विद्यार्थी व एसएमसीचे सदस्य उपस्थित होते.

अतिशय आनंदात व खेळीमेळीच्या वातावरणात आजचा प्रवेशोत्सव कार्यक्रम झाला. आपल्या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झालेली आहे. हे शैक्षणिक वर्ष सर्वांना आनंददायी व समृद्धीचे जावो.



## जासई विद्यालयात प्रवेशोत्सव समारंभ

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग, जासई विद्यालयात शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष कामगार नेते सुरेश पाटील उपस्थित होते त्यांनी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करून रयत शिक्षण संस्थेच्या या विद्यालया मध्ये तुम्ही प्रवेश घेण्याचा चांगला निर्णय घेतला आहे. येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातात, शाळेच्या भौतिक विकासासाठी जेएनपीए कडून ५० लाख रुपये सीएसआर फंड शाळेकडे जमा झालेला आहे. तसेच यापुढे सुद्धा या विद्यालयाच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचे काम कमिटीच्या सहकार्याने केले जाणार आहे असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे तसेच व्हाईस चेअरमन डी.आर. ठाकूर हे उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत विद्यालयाच्या प्राचार्या के.जी. म्हात्रे यांनी करून कार्यक्रमाचे प्रस्तावित केले.

प्रवेशोत्सवाच्या दिनी दुपारी विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात गोड जेवण दिले गेले. या कार्यक्रमासाठी स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य नूरा शेख, गणेश पाटील, मधुकर पाटील, अमृत ठाकूर, गोपीनाथ ठाकूर, यशवंत घरत, प्रकाश म्हात्रे,आदित्य घरत, रघुनाथ ठाकूर, जी. सी. घरत, आणि पालक वर्ग तसेच उपमुख्याध्यापक कुटे सर, पर्यवेक्षिका मुकादम मॅडम आणि सर्व सेवक वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पी.जे. घरत व आभार एस.पी. ठाकरे यांनी मानले.

## संपादकीय

# सुरक्षादक्षतेमुळे गोंधळ

विमान उड्डाणानंतर मूळ विमानतळाकडे मागे वळवल्याच्या किंवा तांत्रिक दोष आढळल्याने उड्डाणच रद्द केल्याच्या एका मागोमाग एक अनेक बातम्या मंगळवारी आल्याने देशातील विमानप्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. पण वास्तविक अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर विमानांच्या सुरक्षिततेबाबत जास्तीची खबरदारी घेतली जात असल्याचा हा परिणाम आहे हे प्रवाशांनी लक्षात घेण्याची गरज आहे.

**अहमदाबाद येथे १२ जून रोजी झालेल्या दुर्दैवी विमान दुर्घटनेने अवघ्या देशाला हादरवून टाकले. या भयावह विमानदुर्घटनेत विमानातील प्रवासी व एअर इंडियाचे दोन पायलट व क्रू सदस्य असे २४१ जण मृत्यूमुखी पडले तर विमान अहमदाबादमधील बीजे मेडिकल कॉलेजच्या होस्टेलच्या परिसरात कोसळल्याने तेथीलही जवळपास ३३ जणांचा यात मृत्यू झाला आहे. बहुतेक मृतदेह जळून खाक झाल्याने त्यांची ओळख पटवणेही शक्य नसल्याने डीएनए चाचणी करून कुटुंबियांना मृतदेह सोपवण्यात येत आहेत. या दुर्दैवी प्रवाशांच्या अंत्यविधीच्या बातम्या आता येत असल्याने त्या भीषण दुर्घटनेच्या आठवणी पुन्हा पुन्हा जाग्या होतच आहेत. अशातच मंगळवारी दिवसभर ठिकठिकाणी बोइंगचे ७८७ ड्रीमलाइनर हे विमान उड्डाणादरम्यान परत मूळ विमानतळाकडे वळवल्याच्या किंवा त्याचे उड्डाणच रद्द केल्याच्या बातम्या एका मागोमाग एक आल्याने विमान प्रवाशांमध्ये घबराटीचे तसेच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. एअर इंडियाने मंगळवारी ७८७-८ ड्रीमलाइनरची एकंदर सहा आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द केली. यात दिल्ली-दुबई, दिल्ली-व्हिएन्ना, दिल्ली-पॅरिस, अहमदाबाद-लंडन, बंगळुरू-लंडन आणि लंडन-अमृतसर या फ्लाइट्सचा समावेश होता. याखेरीज हाँगकाँगहून दिल्लीला येण्यासाठी निघालेले एक ड्रीमलाइनर विमान तांत्रिक समस्येमुळे पुन्हा हाँगकाँगला परतवण्यात आले. तसेच मंगळवारी सकाळी एअर इंडियाच्या सॅनफ्रान्सिस्को-मुंबई फ्लाइटमध्ये ते कोलकात्याला थांबले असताना तांत्रिक बिघाड उद्भवल्याने सर्व प्रवाशांना विमानातून उतरवण्यात आले. एअर इंडियाच नव्हे तर, लुफथान्सा व ब्रिटिश एअरवेजकडूनही अनुक्रमे हैदराबाद आणि चेन्नईकडे निघालेली दोन विमाने पुन्हा फ्रँकफर्ट आणि लंडन या मूळ विमानतळांकडे परतवण्यात आली. इतक्या मोठ्या संख्येने उड्डाणे रद्द व मागे वळवण्यात आल्याने प्रवाशांकडून आश्चर्य व्यक्त होते आहे. वास्तविक, अहमदाबाद येथील दुर्दैवी घटनेनंतर विमानांची सुरक्षा आणि देखभाल याबाबत जगभरातच सवाल उपस्थित केले गेले. भारतात तर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) उड्डाणापूर्वी बोइंग ७८७ विमानांची अनिवार्य सुरक्षा तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे एअर इंडियाने विमानांच्या विलंबाचा इशारा देखील दिला आहे. सर्व ड्रीमलाइनर विमानांची कसून तपासणी सुरू आहे. यामध्ये विमानांच्या उड्डाणापूर्वी संपूर्ण सुरक्षा तपासणी, इंधन पॅरामीटर देखरेख आणि संबंधित सिस्टमची तपासणी, केबिन एअर कॉम्प्रेसर आणि संबंधित सिस्टमची तपासणी, इलेक्ट्रॉनिक इंजिन नियंत्रण प्रणाली चाचणी, हायड्रॉलिक सिस्टमची तपासणी, टेक-ऑफ पॅरामीटर्सची तपासणी करण्याचे आदेश डीजीसीएने दिले आहेत. यामुळे प्रभावित झालेल्या ग्राहकांना एअर इंडिया रद्द केलेल्या विमानाच्या तिकिटाचे संपूर्ण पैसे परत करत आहे. तसेच मोफत रीशेड्युलिंगची ऑफरही दिली जाते आहे. परंतु तरीही गोंधळ व भीतीचे वातावरण निर्माण झालेच आहे. यातच गोव्यातून मंगळवारी काळजाचा ठोका चुकवणारी घटना समोर आली. गोवा विमानतळावरून उड्डाण करताच इंडिगोच्या विमानाचा तोल जाऊन विमान खाली येऊ लागले. विमान कोसळण्याच्या भीतीने प्रवाशांनी आक्रोश केला. पण पायलटने प्रसंगावधान दाखवत विमान नियंत्रित केले. भीतीचा पगडा मोठा असल्याने सगळ्यांनाच यातून सावरायला वेळ लागणार आहे.**

# देवळे धरणातून रानबाजिरे धरणात लाल माती अन् गाळाचे पाणी





**खबरबात**
**शैलेश पालकर**

महाड औद्योगिक वसाहतीला पाणीपुरवठा करणाऱ्या कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील रानबाजिरे येथील धरणाच्या बॅकवॉटरमध्ये यंदा देवळे धरणाची लालमाती आणि गाळाचे पाणी वाहून आल्याने यावर्षी बॅकवॉटरचा जलाशय उथळ होणार आहे. यामुळे एमआयडीसीने तातडीने या बॅकवॉटरच्या जलाशयातील गाळाचा उपसा करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पोलादपूरनजिकच्या कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील रानबाजिरे या महाड एमआयडीसीसाठी बांधण्यात आलेल्या धरणाचे स्वरूप चिरेबंदी दगडी बांधकाम आणि सांडव्यांच्या भागास काँक्रीटचे अस्तरीकरण तर स्टेलिंग बेसिसच्या भागात सांडव्यांतून येणारे पाणी साठविण्यासाठी काँक्रीटीकरण करण्यात आलेले असे आहे.

या धरणाची लांबी ३२० मीटर्स असून सांडवा १२१.८४ मीटर्स आहे. ८ सांडव्यांवरील दरवाजे १२ मीटर्सचे प्रत्येकी आहेत. उच्चालक मोटर क्षमता १० अश्वशक्ती आहे. धरणाची क्षमता ४० मे.टन आहे. पाणीसाठा ६१.५० मीटर पातळीवर २९.९५ दशलक्ष घनमीटर तर ५५ मीटर पातळीवर १६.४९ दशलक्ष घनमीटर असतो. मृतसाठा ३.६ दशलक्ष घनमीटर असून ६१.५० पातळीवर वापरण्यायोग्य पाणीसाठा २६.३२ दशलक्ष घनमीटर आणि ५५ मीटर पातळीवर पूर्ण संचय पातळी ६१.५० मीटर आहे. सांडव्यांची पातळी ५५ मीटर आहे. भिंतींची पातळी ६४.७० मीटर आहे. धरणाची महत्तम उंची ३३.६१५ मीटर असून पाणलोटक्षेत्र १९७.२५७ चौ.कि.मी इतके आहे. या धरणामुळे २.७० चौ.कि.मी. बुडीत क्षेत्र झाले आहे. सांडव्यांची क्षमता ३२४८.१३४ घनमीटर प्रतिसेकंद एवढी आहे. या धरणाची आपत्कालीन दरवाजे, विद्युत जनित्र आणि उच्चालक क्षमता अशी ठळक वैशिष्ठयेही आहेत. पूरकाळात धरण भरलेले असताना ५८.१० मीटर पाण्याची पातळी असते. सध्या येथील पाण्याची पातळी ५१.५० मीटर एवढी असून ४३ आरएलपर्यंत पाण्याची पातळी खाली करण्याची परवानगी आहे.

मात्र, चार वर्षांपूर्वी धरणाच्या बॅक वॉटरची पातळी ४३ आरएलपेक्षाही कमी करण्यासाठी सर्व सांडव्यांसह सर्व्हिस गेटमधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. २०२२ या वर्षी झालेल्या ६१.५० मीटर पातळीवर २९.९५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठयापैकी २२ मिलीयन क्युसेक पाणीसाठा धरणाचे सहा सांडवे खुले केले असताना अस्तित्वात होता. या सहा सांडव्यासोबतच दोन सर्व्हिस गेटसदेखील उघडण्यात आल्याने साधारणपणे प्रतिसेकंद २५९४६ घनमीटर पाणीसाठयाचा विसर्ग झाला. यामुळे पुराच्या पाण्याचा महाड शहराला २०२२ मध्ये फटका बसला नव्हता. मात्र, २०२३ मध्ये पावसाळ्यापूर्वी केवळ स्टेलिंगबेसिसच्या जलाशयाचे पाणीच रिकामे करण्यात आले होते. त्यामुळे पुन्हा २०२३ मध्ये महाड शहराला पुराच्या पाण्याचा काही भागात सामना करावा लागला होता.

देवळे लघुपाटबंधारे धरण प्रकल्प योजनेच्या दुसऱ्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये कामासाठी ४ कोटी ६८ लाख १ हजार ८७६ रूपये आणि अनुषंगिक खर्चापोटी ६८ लाख ९६ हजार ८५५ रूपये अशी एकूण ५ कोटी ३६ लाख ९८ हजार ७३१ रूपये अशी मंजूरी ३१ मार्च २००५ रोजी मिळाली. या कामाची सुरूवात मार्च १९९७ मध्ये झाली. मात्र, बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम न मिळाल्याने तसेच भूसंपादनात जमिनीचा दर कमी लावल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी १९९८ मध्ये योजनेचे काम बंद केले होते. साधारणतः २००१ मध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना काही प्रमाणात भूसंपादनाचा मोबदला अदा केल्यानंतर मे २००३ मध्ये योजनेचे घळभरणीचे काम पूर्ण करून पाणीसाठा करण्यास सुरूवात केली. मात्र, हे काम पूर्ण झाल्यानंतर देवळे लघुपाटबंधारे योजनेच्या या धरणात पाणीसाठा होत असल्याची चाचणी घेतल्या-घेतल्याच धरणाची गळती सुरू झाली.

यानंतर २७ मे २०२४ रोजी शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटपाच्या कार्यक्रमप्रसंगी तत्कालीन आमदार व विद्यमान मंत्री भरतशेठ गोगावले यांनी देवळे धरण मुळापासून उकरून नव्याने ८७ कोटींचे धरण बांधण्याची घोषणा केल्याने यंदा पोलादपूर तालुक्यातील देवळे येथील धरण मुळापासून उच्चाटन करण्यात आल्याने सावित्री नदीपात्रावरील या धरणाचे अस्तित्वच संपुष्टात आले आहे. या धरणाचा बांध, त्यावरील दगडी पिचिंग, एकमेव लोखंडी दरवाजा, बँकवॉटरच्या जलाशयातील माती असा सर्वच परिसर यंदा पूर्णपणे गायब झाला आहे.

परिणामी, रानबाजिरे धरण यावर्षीपासून सावित्री नदीपात्रावरील एकमेव धरण ठरले आहे. यंदा रानबाजिरे धरणाच्या बॅकवॉटरच्या जलाशयामध्ये देवळे धरणापासून मोठया प्रमाणात लालमाती आणि गाळ वाहून घेणारे सावित्री नदीचे पात्र येऊन सर्व सहा सांडव्यातून मोठया प्रमाणात गाळासह पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

गेल्यावर्षी धरणाच्या बॅकवॉटर आणि पुढील बाजूच्या स्टेलिंग बेसिस जलाशयाची खोली गाळ साठल्याने कमी झाल्याचे निदर्शनास आले असून पावसाळ्यानंतर तातडीने नाम फाऊंडेशनच्या तज्ज्ञांचे पथक रानबाजिरे धरणाच्या परिसराचे अवलोकन करणार असल्याची माहिती 'नाम' जलतज्ज्ञ डॉ. अजित गोखले यांनी 'नाम'चे तालुक्यातील कार्यकर्ते हेमंत भोईटे यांच्यासह प्रस्तुत प्रतिनिधीजवळ वार्तालापादरम्यान दिली.

रायगड जिल्हा परिषदेचे यापूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनीदेखील या तज्ज्ञांसोबत चर्चा केली. मात्र डॉ.पाटील यांच्या बदलीमुळे धरणाच्या बॅकवॉटरच्या आणि स्टेलिंग बेसिसच्या जलाशयांची खोली वाढविण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी होईल अथवा कसे, याबाबत साशंकता निर्माण झाली असताना विद्यमान मंत्री भरतशेठ गोगावले यांनी देवळे धरण मुळापासून उकरून नव्याने धरण बांधण्याची घोषणा केल्यानुसार सद्यस्थितीत देवळे धरण पूर्णपणे गायब झाले असून रानबाजिरे धरण हेच सावित्री नदीवरील पोलादपूर तालुक्यातील एकमेव धरण राहिले आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# मध्यमवर्गीयांसाठी मिनी फॉर्च्युनर कार उपलब्ध

आपल्याकडे चारचाकी गाडी असावी आणि त्यातही फॉर्च्युनरसारखी गाडी असावी असे कोणाचे स्वप्न नसते, मात्र सर्वसामान्य लोकांसाठी हे स्वप्न फक्त स्वप्नच राहते, कारण या फॉर्च्युनर गाडीची किंमत सर्वसामान्य नागरिकांना न परवडणारी अशी असते, मात्र याच सर्वसामान्यांच्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी टोयोटा कंपनीने एक मोठा निर्णय घेतला आहे. टोयोटा कंपनीने मध्यमवर्गीयांसाठी मिनी फॉर्च्युनर कार लॉन्च केली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे स्वप्न सत्यात उतरण्याची वेळ आली आहे.




टोयोटा ही एक जपानची कंपनी असून जगातील सर्वात मोठ्या वाहन उत्पादक कंपन्यांपैकी एक आहे. ही कंपनी विविध प्रकारच्या गाड्यांची निर्मिती करते. याच कंपनीने सर्वसामान्य नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन मध्यमवर्गीयांना परवडेल, अशी SUV Hyrydeची नवीन २०२५ ची आवृत्ती म्हणजेच मिनी फॉर्च्यूनर कार बाजारात आणली आहे. २७ किमी मायलेज देणारी ही मिनी फॉर्च्यूनर आणि लक्झरी फीचर्सने लोडेड आहे. सध्या या कारची सोशल मीडियावरही मोठी चर्चा आहे. ही कार फॉर्च्यूनरसारखी दिसत असल्यामुळे या कारला मिनी फॉर्च्यूनर म्हणून नाव दिल आहे. टोयोटा कंपनीने या कारच्या फीचर्समध्ये बदल केला असून ही कार आता हायब्रीड, पेट्रोल आणि सीएनजी या तीन प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. या कारमध्ये ५ स्पीड मॅन्युअल आणि ६ स्पीड स्वयंचलित गिअरबॉक्स असे विविध ऑपशन्स देण्यात आले आहेत.

सीएनजीमध्ये ही कार २७ किमी मायलेज तर हायब्रीडमध्ये ही कार २० ते २२ किमी मायलेज देते. या कारला एक स्पोर्ट कारसारखा लुक देण्यात आला आहे. या कारमध्ये हवेशीर फ्रंट सीट, मोठी टचस्क्रीन, ६ एअरबॅग, ईबीडी आणि ३६० डिग्री कॅमेरासह अनेक युनिक फिचर्स देण्यात आले आहेत. ज्या योगे लोकांना अनेक ॲडव्हान्स फीचर्स या मिनी फॉर्च्यूनरमध्ये मिळणार आहे. ही कार नागरिकांना ११.३४ लाख रुपयांमध्ये मिळणार असून यामध्ये व्हेरिएंट आणि इंधन प्रकारानुसार या कारची किंमत १९ लाखांपर्यंत जाणार आहे. त्यामुळे आता सर्वसामान्यांच्या घरासमोर ही आता फॉर्च्यूनरसारखी गाडी पाहायला मिळणार आहे.

# भारतीय महिला शास्त्रज्ञ कमला सोहोनी

## निमित्त



कमला सोहोनी (१८ जून १९११ – २८ जून १९९८) या भारतातील पहिल्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीधारक शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत.

ब्रिटीश अंकित राष्ट्रातली एक हिंदुस्थानी मुलगी म्हणून त्यांना आपल्या शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. इसवी सन १९३३मध्ये रसायनशास्त्र हा विषय घेऊन त्या पहिल्या वर्गात बी.एस्सी.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यांनी वर्तमानपत्रातीत जाहिरातीनुसार शास्त्रीय संशोधनासाठी बंगलोर येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ़ सायन्स'मध्ये अर्ज केला. टाटांनी १९११ मध्ये स्थापन केलेल्या या संस्थेत प्रवेश मिळणे अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जाई. प्रवेशासाठी कमलाबाई पूर्णपणे पात्र होत्या, परंतु संस्थेचे प्रमुख, नोबेल पारितोषिक विजेते सर सी.व्ही. रामन यांनी मुलगी असल्याने प्रवेश देता येत नाही असे कमलाबाईंना कळविले. कमलाबाई श्री. रामन यांना प्रत्यक्ष भेटल्या व मुलगी म्हणून माझ्यावर होणारा अन्याय मी कदापि सहन करणार नाही आणि इथे राहून मी संशोधन करून एम.एस्सी. होणारच, असे ठामपणे सांगितले. श्री. रामन यांनी कमलाबाईंच्या हट्टास्तव त्यांना एका वर्षासाठी प्रवेश दिला.मग वर्षभर कमलाबाईंनी बायोकेमिस्ट्री या विषयाचा झपाटून अभ्यास केला. वर्षअखेर रामन त्यांना म्हणाले. तुमची निष्ठा आणि चिकाटी पाहून असे वाटते की, यापुढे संस्थेत फक्त मुलींनाच प्रवेश द्यावा.

पुढे १९३७मध्ये मुंबई विद्यापीठाच्या स्प्रिंगर रिसर्च आणि सर मंगलदास नथूभाई या शिष्यवृत्त्या मिळवून कमला सोहोनी इंग्लंडला गेल्या. तिथे, नोबेल पारितोषिकविजेते सर फ्रेड्रिक गॉलन्ड हॉपकिन्स यांना भेटून, संस्थेत प्रवेश देण्याची विनंती केली. त्यावर त्यांनी माझ्या प्रयोगशाळेतील सर्व जागा भरल्या आहेत, तुलाच जागा मोकळी दिसली तर सांग असे सांगितले. कुणाचीच ओळख नसल्याने बाई हताश झाल्या, तेव्हाच तेथील एक शास्त्रज्ञ डॉक्टर रिक्टर यांनी त्यांना आपली जागा देऊ केली. दिवसा त्या जागेवर, सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत बाई काम करीत, आणि रात्री डॉ. रिक्टर. पहिले सत्र संपायला केवळ दोन-तीन दिवस बाकी असताना कमलाबाईंनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेतला आणि 'प्राणिमात्रांप्रमाणे सर्व वनस्पतीतीलही साऱ्या जीवनक्रिया 'सायटोक्रोन-सी'च्या मध्यस्थीने एन्झाइम्समुळे होतात, हे मूलभूत महत्त्वाचे संशोधन सादर करून १९३९ साली केंब्रिज विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही पदवी संपादन केली. इतरांचे प्रबंध हजार-पंधराशे पानांचे असताना, कमलाबाईंचा प्रबंध अवघ्या ४० पानांचा होता आणि तो त्यांनी त्यावेळी एका व्याख्यानाद्वारे सभागृहापुढे ठेवला.

त्यानंतर अनेक शास्त्रज्ञाच्या आग्रहाला बळी पडून पुढील संशोधनासाठी इंग्लंडमध्ये न राहाता, डॉ कमलाबाई मायभूमीच्या प्रेमाने भारतात परत आल्या. दिल्लीच्या लेडी हार्डिंग्ज कॉलेज व पुढे मुंबईच्या (रॉयल) इन्स्टिट्यूट ऑफ़ सायन्स या संस्थेत त्यांनी काम केले. मुंबईच्या याच संस्थेच्या निदेशक म्हणून त्या निवृत्त झाल्या. भारतीय विज्ञान संस्था, मुंबई, भारत: कडधान्यांमधील ट्रिप्सीन इनहिबिटर्स. आरे दूध कॉलनीतील दूध, गुरांचे गवत, वासरांचा आहार, धानआट्यातील पौष्टिक घटक, नीरा या पेयातील उपयुक्त घटक, त्यांचे माणसांवर परिणाम. नीरा संशोधनाबद्दल त्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट संशोधनाबद्दलच राष्ट्रपती पारितोषिक मिळाले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# थंड पाण्याने अंघोळ करणं ठरू शकते घातक!

बहुतांश जण उन्हाळा असो किंवा पावसाळा गरम पाण्याने अंघोळ करून दिवसाची सुरुवात करतात, काही जणांना थंड पाण्याने अंघोळ करण्याची सवय असते. ते बारा महिने अंघोळीसाठी थंड पाण्याचा वापर करतात. थंड पाण्याने अंघोळ करण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. पण थंड पाण्याने अंघोळ करणं प्रत्येकासाठीच फायदेशीर नाही.



मुंबईतील ग्लेनेगल्स हॉस्पिटलमधील इंटरनल मेडिसिन सीनियर कन्सल्टेंट डॉ. मंजुषा अग्रवाल यांनी म्हटले की, दीर्घकाळापासून मधुमेह किंवा श्वसनासंबंधित आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांनी दररोज थंड पाण्याने अंघोळ करणे टाळावे. तसेच रोगप्रतिकारक शक्ती कमकूवत असलेल्या किंवा दीर्घकाळापासून विविध आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांनी थंड पाण्याने अंघोळ केल्यास आरोग्यस्थिती गंभीर होऊ शकते. तसेच बरं होण्याची प्रक्रिया मंदावू शकते.

तज्ज्ञांच्या मते, खालील लोकांनी थंड पाण्याने अंघोळ करणे टाळावे.

१) हृदयविकार असलेले लोक-थंड पाण्याने अंघोळ केल्याने रक्तवाहिन्या अचानक आकुंचन पावू शकतात, ज्यामुळे रक्तदाब आणि हृदयाची गती वाढते. कोरोनरी आर्टरी डिसीज किंवा हार्ट फेल्युअरसारख्या हृदयरोग असलेल्या लोकांची स्थिती आणखी बिकट होऊ शकते आणि हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोकचा धोका वाढू शकतो.

२) उच्च रक्तदाब असलेले लोक-उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींना हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आजारांचा धोका जास्त असतो. अशा लोकांनी थंड पाण्याने अंघोळ केल्यास रक्तदाब वाढू शकतो,

३) स्ट्रोकचा धोका असलेले लोक-ज्या लोकांना स्ट्रोक किंवा सेरेब्रोव्हस्कुलर आजारांचा इतिहास आहे, अशा लोकांनी थंड पाण्याने अंघोळ करताना सावधगिरी बाळगली पाहिजे. अचानक शरीराच्या तापमानात बदल झाल्याने रक्तदाबात तीव्र वाढ होऊ शकते, यामुळे वारंवार स्ट्रोक येण्याचा धोका वाढू शकतो.

४) रेनॉड रोग असलेल्या व्यक्ती-रेनॉड रोग हा एक असा आजार आहे, ज्यामध्ये थंडीमुळे हाता-पायांच्या बोटांमधील रक्तवाहिन्या जास्त प्रमाणात आकुंचन पावतात. रेनॉड रोग असलेल्यांना थंड पाण्याच्या संपर्कात आल्याने तीव्र वेदना, सुन्नपणा आणि अत्यंत अस्वस्थता येऊ शकते

# पेणमध्ये महावितरणच्या अनागोंदी कारभाराविरोधात भाजप आक्रमक

## ◆ भ्रष्ट अभियंत्यांना निलंबित करण्याची मागणी




**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यात विद्युत पुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रकार वाढले असल्याने नागरि पुरते हैराण झाले आहेत सर्वसामान्य नागरिक तसेच छोट्या मोठ्या व्यवसायांबरोबरच येथील गणपती कारखान्यांनाही याचा चांगलाच फटका बसला आहे

पेण महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत पेण भाजप आक्रमक झाला असून भाजप युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी महावितरण कार्यालयावर धडक देऊन अधिकाऱ्यांना भोंगळ कारभाराबाबत जाब विचारत अभियंता सिद्धार्थ खोब्रागडे आणि चेतन पाचपांडे यांना त्वरित निलंबन करण्याचे निवेदन अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांच्याकडे देण्यात आले आहे.

तसेच सुधारित वितरण क्षेत्र योजना आरडीएसएस सारख्या योजनांमध्ये भ्रष्टकारभार करणारे अभियंते यांचे त्वरित निलंबन झाले नाही तर खासदार धैर्यशिल पाटील व आमदार रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निलंबनाबाबत तक्रार करणार असल्याचे भाजप युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे यांनी सांगितले.

महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत वारंवार तालुक्यातील वीज पुरवठा खंडित होत आहे तसेच राज्य शासनाने ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे परंतु अभियंत्यांकडून योजनेत भ्रष्टाचार करून योजना केवळ कागदावरच राबवल्या जात असल्याने वेळेवर तालुक्यात मेंटेनन्सची कामे केली गेली नाहीत, जुन्या लाईनी बदलल्या जात नाहीत, पोल बदलले नाहीत, डिपी बदलले नाही यामुळे वीजपुरवठ्याच्या समस्या होत आहेत तरी ही नागरिकांना भरमसाठ वीज बिल देण्यात येत आहेत, या इतर समस्येबाबतची पोलखोल पेण भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आली तसेच अभियंत्यांच्या निलंबनाची मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी पेण भाजप युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे, भाजप तालुकाध्यक्ष संजय डंगर, माजी जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, माजी जि. प. सदस्य डी.बी. पाटील, परशुराम पाटील, मुरलीधर भोईर, अमित पाटील, विवेक म्हात्रे, गणेश पाटील, प्रशांत पाटील, काशिनाथ पाटील, चंद्रकांत पाटील आदी भाजप पदाधकारी व कार्यकर्त्य उपस्थित होते.

पेण भारतीय जनता पार्टीच्या वतीने निवेदन आले असून आमच्या अधिकारी वर्गाच्या बाबतीत तसेच विजेच्या लपंडाविषयी तक्रार आली असून झालेल्या कामाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येईल व कारवाई करण्यात येईल असे यावेळी अधिक्षक अभियंता धनराज बिक्कड यांनी सांगितले.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर दोन अपघातात दोघे ठार, तिघे गंभीर

**खोपोली,खालापूर : प्रतिनिधी**



मुबंई पुणे एक्सप्रेस वेवर आज पहाटे एका एलपीजी गॅस टँकरने समोरील ट्रेलर आणि अज्ञात ट्रकला जोरदार धडक दिल्याने तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला असून या अपघातात गॅस टँकर चालक हा जागीच ठार झाला आहे

मुबंई पुणे एक्सप्रेस वेवरून एलजीपी गॅस टँकर क्रमांक (चक ०९ एच् ४४३३) हा चालक सुनील तांबरे( वय ५० वर्ष रा धाराशिव) हा मुबंई हुन पुण्याकडे एलपीजी टँकर घेऊन जातं असताना खालापूर टोल नाक्याच्या पाठीमागे आला असता चालकाचे टँकर वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील साईड पट्टीवर उभ्या असलेल्या ट्रेलर क्रमांक (छङ ०१ -ग ६०७३ )ला पाठीमागून जोरदार धडक दिली, तर पुढे उभ्या अडलेल्या अज्ञात ट्रकला ट्रेलरने जोरदार धडक दिल्याने तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे,

या अपघातात गॅस टँकर ची केबिन दबल्याने त्या केबिन मध्ये चालक सुनील तांबरे याचा अडकून जागीच मृत्यू झाला आहे, तर अद्यात ट्रक हा पळून गेला आहे, या टँकर मध्ये एलपीजी गॅस असल्याने त्यांची माहिती तात्काळ केमिकल एक्सपर्ट धनंजय गिध यांना देऊन ते घटनास्थळी आल्याने त्यांनी सदर टँकरची तपासणी केली असता गॅस लिकेज नसल्याचे सांगितल्याने मोठी दुर्घटना टळली आहे,

या अपघाताची माहिती मिळताच खालापूर पोलीस, बोरघाट महामार्ग पोलीस, देवदूत यंत्रणा, हेल्प फाउंडेशनचे सदस्य, आयआरबी पेट्रोलिंग, यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत केबिन मध्ये अडककेल्या चालकला बाहेर बाहेर काढून दोन्ही अपघात ग्रस्त वाहने क्रेनच्या साहाय्याने रस्त्याच्या बाजूला घेऊन रस्ता वाहतूकसाठी चालू करण्यात आला आहे

दुसरी घटना मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे लेनवर भातान बोग्यात बस आणि पिक अप चा अपघातात १ ठार तर तीन गंभीर जखमीं झाले ठार झालेली व्यक्ती ही बस मधली होती पिंटू पवार २७ रा कोपरखैरणे असे असून रिझवान हलवाई २५ खारघर, समीर खान २२, महेश काठावले ४० विटा हे गंभीर जखमीं झाले तिन्ही रुग्ण पिक अप मधील आहेत एम जी एम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पहिल्या लेनवर बसचा टायर पंक्चर काढत असताना मागून आपलेल्या पीकअपची धडक लागल्याने बस मधून उतरून मदत करणारे पिंटू पवार जागीच ठार झाले. पिकप मधील चालक आणि इतर २ जण गंभीर जखमी झाले.



# तळा शहरात पावसामुळे घरावर उन्मळून पडले झाड

**तळा : प्रतिनिधी**

रविवारी रात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे तळा शहरात घरावर झाड कोसळून नुकसान झाल्याची घटना घडली.

तालुक्यात रविवारी रात्रभर झालेल्या पावसासह सोसाटच्याच्या वाऱ्यामुळे तळा शहरातील परीट आळी येथील संतोष तळेकर यांच्या घरावर पहाटे चारच्या सुमारास भलेमोठे झाड कोसळले. यावेळी झालेल्या मोठ्या आवाजामुळे संतोष तळेकर आणि परिवार खडबडून जागे झाले. घरावर झाड कोसळल्याचे पाहून त्यांनी सुरक्षित स्थळी आसरा घेतला.



घटनेची माहिती मिळताच तहसील कर्मचारी यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. या अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही, मात्र घरासमोरील संपूर्ण शेड कोसळून भिंतीला तडा जाऊन घराचे नुकसान झाले आहे. तळा नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी तेथे जाऊन पडलेल्या झाडाची साफसफाई केली.

# चिमुकलीने वाचवले दयाळ पक्ष्याच्या पिल्लांचे प्राण

## दोऱ्यामध्ये अडकलेल्या दोन पिल्लांची केली मुक्तता

**माणगाव : बातमीदार**

माणगाव येथील विकास कॉलनीत राहत असलेल्या प्रसाद सुतार यांना त्यांच्या घरासमोर दारात पक्ष्याची दोन लहान पिल्ले आढळून आली, त्यांची लहान मुलगी प्रीत हिचे ह्या पक्ष्याच्या पिल्लांकडे लक्ष गेले, दोन्ही पिल्ले एकमेकांना चिटकून असल्याचे लक्षात आले, प्रसाद सुतार यांनी त्वरीत माणगांवचे वन्यजीव अभ्यासक शंतनू कुवेसकर ह्यांना संपर्क साधला.




सध्याच्या पावसाच्या सुरुवातीच्या दिवसात अनेक पक्ष्यांचा विणीचा हंगाम संपून पिल्ले घरट्यातून बाहेर उडून जातात, त्यामुळे घरट्यातून पहिल्यांदाच उडालेली ''दयाळ'' म्हणजेच ''ओरिएंटल मॅगपाय रॉबिन'' ह्या पक्ष्याची हि पिल्ले खाली पडली असावी असा अंदाज लावत शंतनू कुवेसकर यांनी पिल्लाना एखाद्या झाडावर सोडून द्यावे असे प्रीतीच्या वडिलांना सांगितले परंतु पक्ष्याची लहान पिल्ले हाताळण्याची हिम्मत होत नसल्या कारणाने व पिल्ले एकमेकांना अडकून पडल्याने त्यांनी शंतनु कुवेसकर यांना येथे येणाच्या आग्रह केला.

प्रीतीने कुवेसकर पोहोचेपर्यंत पिल्लाना एका सुरक्षित जागी टोपल्याखाली झाकून ठेवले होते, कुवेसकर यांनी पाहणी केली असता लक्षात आले कि पक्षी घरटे बांधण्यासाठी अनेक प्रकारच्या वस्तू गोळा करून नेतात, मानव वस्तीजवळ कापूस-धागे-दोरे घरट्यासाठी घेऊन जाताना दिसून येतात, घरट्यासाठी नेलेल्या एका दोऱ्यामध्येच पिल्लांची वाढ होत असतानाच दोन पिल्लांच्या पायाला दोरा गुंडाळला गेला असावा आणि पिल्लांची तशीच वाढ झाली पण जेव्हा पिल्लांची घरट्यातून उडण्याची वेळ आली त्यावेळेला त्यांचे पाय गुंतलेले असल्याकारणाने ते उडण्यास असमर्थ होते असे लक्षात आले.


शंतनु कुवेसकर यांच्या मार्गदर्शनाखाली चिमुकल्या प्रीतीनेच सुरक्षितरित्या पिल्लांच्या पायातील दोरा कापून पिल्लांना मुक्त केले आणि आपल्या घराजवळीलच चिकूच्या झाडावर सोडले, सोडता क्षणीच त्या पिल्लांचे पालक पक्षी लगेच पिल्लांकडे येऊन त्यांना भरवू लागले, थोड्याच वेळात पिल्लांसोबत छोटी छोटी उड्डाणे घेऊन पालक पक्षी पिल्लांना सुरक्षित ठिकाणी घेऊन गेले.



**खालापूर : सोमवारी शाळेचा पहिला दिवस असल्याने विद्यार्थी, पालकांनी मोठी गर्दी केली होती. जनता विद्यालयाच्या समोरील रस्ता पालकांनी व्यापला होता. समाजमंदिर मार्ग तसेच जैन मंदिर मार्ग, भानवजकडे जाणाऱ्या मार्गावर यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.**

## हरवले आहे

**श्री. अशोक पाडुरंग घरत रा. फुंडे, पो. बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड येथील रहिवासी असुन कामानिमित्त चेबूंर- मुंबई येथे गेले होते. ते तेथून बुधवार दिनांक २१/०४/२०२५ या दिवसापासून हरवले आहेत ते आज पर्यंत परत आले नाही. वय वर्षे ६८, जर कोणाला भेटले तर खालील नाव व नंबर वर संपर्क साधावा.**



- ◆ दिनेश घरत- ८९२८३७७७४३
- ◆ सुधीर बैकर- ८००७१४०४५३
- ◆ सुजाता बैकर- ९९७०३२९०४२

# सुवर्णपदक विजेत्या परीचे अमित घाग यांनी केले कौतुक

**धाटाव : प्रतिनिधी**

नेपाळ काठमांडू येथे ३० व ३१ मे रोजी झालेल्या आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत भारताच्यावतीने खेळताना रोह्याच्या परी महाडिक सुवर्ण पदक पटकावले होते . परीच्या या नेत्रदीपक बद्दल तिचे विशेष कौतुक रोहा भाजपा तालुका अध्यक्ष अमित घाग त्यानी केले व पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या .

या वेळी समवेत कृष्णा बामणे, नरेश कोकरे , श्रद्धा घाग ( महिला आघाडी चिटणीस रायगड ) , तृप्ती बामणे तसेच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते



# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६

कार्यालय :- २७४५८०४०/४१/४२ | ई मेल:- panvelcorporation@gmail.com

अग्निशमनविभागः- २७४६१५०० | फॅक्स नंः ०२२-७४५२२३३

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा क्र./प.म.पा./अ.वि./२६२१/ प्र.क्र.१६/१०६९/२०२५ | पनवेल महानगरपालिका अग्निशमन / आपत्ती व्यवस्थापन विभागाकरीता अत्याधुनीक साधन सामुग्री खरेदी करणेकामी. |

या ई-निविदे बाबतची विस्तृत माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १८/०६/२०२५ ते दि. २७/०६/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत उपलब्ध होईल, संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. २६५/२६७/२०२५
दिनांक :- १७/०६/२०२५

## MAHAVITARAN — TENDER NOTICE

Following Tender is invited from Eligible Bidders for Pen Circle, Raigad District. The Details are as given below-

| Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission |
|---|---|---|
| SE/PC/T-01/2025-26 | **Tender for supply of 12 SWG, 14 SWG, 16 SWG, 18 SWG, 20 SWG Tinned cooper fuse wire under pen circle. Tender amount: Rs. 5 lakhs** | Sale Date; - Dt.18/06/2025 To Dt.02/07/2025 up to 17.00 Hrs. Bid Submission Dt.02/07/2025 upto 23:00 Hrs. |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website **http://works.mahadiscom.in/eTender/etender.**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN**

।।अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।

# खोपोली नगरपरिषद, खोपोली

**ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३.**
फोन नं. (०२१९२)२६४२१२ Email ID :- cokmckhpoli@gmail.com

## दरपत्रक सुचना

खोपोली नगरपरिषद कार्यालयीन कामकाजासाठी राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कृति आराखड्यातील ई-गव्हर्नन्स सुधारणे अंतर्गत सर्विस डीलिवरी साठी व्हॉट्सअॅप आणि AI/Blockchain/DigiLocker चा वापर करून खोपोली नगरपरिषद करीता अप्लिकेशन बनविणे, या कामी अंदाजपत्रक बनविणेसाठी शासनाच्या राज्य दर सुचित दर उपलब्ध नसल्याने भाजारभावानुसार दरपत्रक मागविणे करीता अधिकृत पुरवठाधारकाकडून जाहीर पद्धतीने दरपत्रक मागविणेत येत आहेत.
तपशिल खालील प्रमाणे:-

| अ.क्र. | कामाचा तपशील |
|---|---|
| १ | राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कृति आराखड्यातील ई-गव्हर्नन्स सुधारणे अंतर्गत सर्विस डीलिवरी साठी व्हॉट्सअॅप आणि AI/Blockchain/ DigiLocker चा वापर करून खोपोली नगरपरिषद करीता अप्लिकेशन बनविणेबाबत. |

**नियम व अटी :-**

१. वरील नमुद कामकाजाबाबतची माहिती तपशीलवार नगरपरिषद कार्यालयातील संगणक विभागामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. तसेच प्रत्यक्ष पाहणी करूनच पुरवठाधारकाने दर नमूद करावयाचे आहेत.
२. पुरवठादाराने स्वतःचे लेटरहेडवर सुस्पष्ट अक्षरात खाडाखोड न करता दर नमूद करून, स्वाक्षांकित करून एक बंद लखोट्यात सिलबंद करून दरपत्रके सादर करावीत. अशा लखोट्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद, खोपोली यांचे नावे विहित मुदतीत म्हणजे दि.१८/०६/२०२५ ते दि.२४/०६/२०२५ रोजी सायं. ०५:०० पर्यंत खोपोली नगरपरिषद कार्यालय येथे स्विकारण्यात येतील.
३. विहित मुदतीत प्राप्त होणारी दरपत्रकेच स्विकारली जातील. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे दरपत्रक ग्राह्य धरली जाणार नाहीत. त्यामुळे कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही.
४. वरील प्रमाणे विविध मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्वात कमी दराच्या दरपत्रकानुसार होणाऱ्या अंदाजपत्रकास शासनाकडील सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर, विहित्त पद्धतीने निविदा प्रक्रियेची कार्यवाही करणेत येईल.
५. वरील नमुद कामकाजाकरीताचे दर सर्व करासहीत देण्यात यावे.
६. कोणतेही कारण नमूद करून अथवा असे कारण न देता आलेले दरपत्रके स्वीकारणे अथवा फेटाळण्याचा अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवला आहे.
७. कामाचे अटी-शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**खोपोली नगरपरिषद**

**जा.क्र. केएमसी/संगणक/१२३९**
**दि.१७/०६/२०२५**

# फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ

## गुंतवणुकीच्या नावाखाली गंडा

**पनवेल : वार्ताहर**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली फसवणूक होण्याचे प्रमाण अलिकडच्या काळात वाढले आहे. अनेक लोक 'शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करा आणि जास्त नफा मिळवा' अशा आमिषांना बळी पडतात. फसवणूक करणारे विविध ॲप्स किंवा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सद्वारे लोकांपर्यंत पोहचतात आणि त्यांना खोट्या आश्वासनांनी आकर्षित करून त्यांच्याकडून पैसे उकळतात. अशाच प्रकारे खारघरमध्ये राहणाऱ्या एका ५४ वर्षीय गृहस्थाला शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचे सांगून फसवणूक करण्याचा प्रकार घडला आहे.

खारघर सेक्टर ३० येथे राहणाऱ्या अनिरूध्द कुलकर्णी यांच्याबाबतीत सदरचा हा प्रकार घडला आहे. कुलकर्णी हे राहते घरी असतांना इंस्ट्राग्रामवरील दिव्यांगना थोरात व अपस्टॉक सेक्युरिटीज हे ॲप चालविणाऱ्या विनीता पडोदिया नावाच्या दोन अज्ञात महिलांनी संगनमत करून कुलकर्णी यांना शेअर मार्केट संबंधीत मार्गदर्शनपर मॅसेज पाठवत त्यांचा विश्वास संपादन केला. यानंतर शेअर मार्केट ट्रेडींग केल्यास तुम्हाला मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवून, कुलकर्णी यांच्या मोबाईल एक लिंक पाठवून त्याआधारे त्यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. याबाबतचा परतावा न देता फसवणूक केली.

याबाबत कुलकर्णी यांनी खारघर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## नोकरीच्या बहाण्याने अडीच लाखांना चुना

**पनवेल : वार्ताहर**

पोस्ट ऑफिस आणि इन्कम टॅक्स विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका भामट्याने चक्क एका पोलीस अधिकाऱ्याच्या भावाला अडीच लाख रुपयांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. गणेश वसाराम राठोड असे या भामट्याचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या भामट्याने अशाच पद्धतीने अनेक बेरोजगार तरुणांची फसवणूक केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेला २४ वर्षीय तरुण ऋषी हा कामोठे भागात राहत असून त्याचा मोठा भाऊ पोलीस अधिकारी आहे. २०२४ मध्ये गणेश राठोड हा या पोलीस अधिकाऱ्याच्या संपर्कात आला होता. दरम्यान, त्याने सरकारी नोकरी मिळवून देत असल्याचे या पोलीस अधिकाऱ्याला सांगून त्याने ऋषी याला सरकारी कार्यालयात नोकरीला लावतो, असे सांगत त्याच्याकडून ऑक्टोबर २०२४ मध्ये मूळ शैक्षणिक कागदपत्रे घेतली. त्यानंतर त्याने ऋषी याला सीएसटी येथील जीपीओ कार्यालयात पोस्टल क्लार्क पदाचे बनावट नियुक्तीपत्र देऊन त्याचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर गणेश राठोड याने ऋषी याच्याकडे अडीच लाख रुपयांची मागणी केली होती. त्यानुसार, ऋषीने गणेश राठोड याच्या भावाच्या खात्यावर ५० हजार रुपये, तर दोन लाख रुपये त्याच्या पत्नीच्या खात्यावर पाठवले होते. त्यानंतर ऋषी हा गणेश राठोड याच्याकडे नोकरीबाबत नेहमी विचारपूस करत होता, मात्र तो कारणे सांगून टाळाटाळ करत होता.

या कालावधीत गणेश राठोड याने तुकाराम कोळी याला देखील नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडूनदेखील त्याने एक लाख रुपये उकळल्याची माहिती ऋषी याला मिळाली. त्यावर एप्रिल २०२५ मध्ये गणेश राठोड याने इन्कम टॅक्स डिपार्टमेंटमध्ये टॅक्स असिस्टंट पदासाठी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून ३० मे २०२५ रोजी ऋषी आणि तुकाराम कोळी या दोघांना चर्चगेट येथील इन्कम टॅक्स कार्यालयात तसेच महालेखापाल कार्यालयात नेले. त्या ठिकाणी बनावट अधिकारीद्वारे त्याच्या कागदपत्रांची तपासणी करण्याचा बहाणा केला.

तसेच कामावर रुजू होण्यासाठी मंगळवारची तारीख देऊन दोघांकडून अनुक्रमे अडीच लाख रुपये व चार लाख रुपये रोख स्वरूपात देण्याची मागणी केली, मात्र या प्रकरणात गणेश राठोड आपली फसवणूक करत असल्याचे ऋषीच्या लक्षात आल्यावर त्याने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला. त्यानंतर त्याने राठोड याला पैसे परत मागण्यासाठी गत ३ जून रोजी बोलवले असता त्याने वेगवेगळ्या यूपीआय खात्यांवरून ऋषी याला एक लाख रुपये परत पाठवले, मात्र उर्वरित रक्कम परत केली नाही. या प्रकरणाचा तपास कामोठे पोलीस करत आहेत.

# उरणकरांची पाणीकपात रद्द

## रानसई धरणाची जल पातळी वाढली

**उरण : प्रतिनिधी**



उरण तालुक्यातील रानसई धरण परिसरात झालेल्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे ११६ फूट उंचीच्या धरणात दोन दिवसांत झालेल्या जोरदार पावसामुळे १०२ फुटावर पाणी पातळी वाढली आहे. या पाणी पातळीने शंभरी पार केली असून येत्या काही दिवसांतच रानसई धरण भरण्याची शक्यता आहे. असे घडल्यास बऱ्याच कालावधीनंतर जून अखेरपर्यंत हे धरण भरणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. रानसई धरणाची पाणी पातळी वाढल्याने उरणच्या एमआयडीसीने नागरिकांसाठी जाहीर केलेली पाणी कपात रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

रानसई धरण हे गेली अनेक वर्षे जुलै महिन्याच्या १५ तारखेनंतर भरून वाहते, मात्र यावर्षी मे महिन्यात पावसाला सुरूवात झाल्याने जून महिन्यातच धरणातील पाणी पातळी वाढू लागली आहे. उरण शहर आणि येथील २५पेक्षा अधिक ग्रामपंचायतीना पाणीपुरवठा करणाऱ्या एमआयडीसीकडून मंगळवार व शुक्रवार या दोन दिवसांची पाणी कपात करण्यात आली होती. उन्हाळ्यात रानसई धरणातील पाणी साठा कमी होते. त्यामुळे धरणात जून अखेरपर्यंत पुरवठा करता येईल यासाठीचे नियोजन म्हणून ही पाणी कपात करण्यात येते.

उरणच्या नागरिकांना ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यापासूनच वर्षोनुवर्षे पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे. धरणाची पाणी क्षमता वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेक वर्षे धूळखात बसला आहे. ही स्थिती बदलून उरणला पाणीदार करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. उरण तालुक्यातील नागरिकांना व येथील उद्योगासाठी लागणारे पाणी एमआयडीसीच्या रानसई धरणातून पुरविले जात असून उरणकरांना दररोज ४१ दश लक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे, मात्र एमआयडीसीकडे केवळ ३० दश लक्ष लिटर पाणीच उपलब्ध आहे.

**यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाल्याने रानसई धरण परिसरातील पावसामुळे धरणाच्या पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे या वर्षी जून महिन्याच्या अखेरपर्यंत हे रानसई धरण भरण्याची शक्यता आतापर्यंत झालेल्या पावसामुळे निश्चितपणे आहे.**

–ग्यानदेव सोनवणे, एमआयडीसी अभियंता, उरण

## निवडक

### डाळींच्या दरात घसरण

**पनवेल :** राज्यात सुरू असणाऱ्या अवकाळी पावसामुळे एकीकडे भाज्यांच्या दरात वाढ झाली असून भाज्यांनी शंभरी गाठली आहे. तर दुसरीकडे डाळींच्या दरात घसरण झाल्यामुळे गृहिणींना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. गेल्या काही आठवड्यांपासून डाळींच्या दरात घसरण होत आहे. तूर, चणाडाळ, मूग, मसूर आणि हरभरा यांसारख्या प्रमुख डाळींचे दर ५ ते १५ रुपयांपर्यंत घसरले आहेत. या घसरणीमुळे किरकोळ ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. यंदा डाळींच्या उत्पादनात वाढ झाली आहे. तर यंदा चांगल्या पावसामुळे डाळींचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे. उत्पादन वाढल्यामुळे मालाची आवकही बाजारात वाढली आहे. त्यामुळे डाळींच्या दरात घसरण होत आहे.

### 'विद्याभवन'मध्ये विद्यार्थ्यांचे औक्षण



**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंदात मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य, पुस्तके आणि चॉकलेट्सचे वाटप करण्यात आले. मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, मुख्याध्यापक गोरख कदम, समन्वयक पांडुरंग मुळीक, आदर्श शिक्षक अविनाश कुलकर्णी, शिक्षिका पौर्णिमा खर्जे यांनी या वेळी विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. ध्येय, आरोग्य, संस्कार, अभ्यास, शालेय शिस्त, क्रीडा, आणि उपक्रमांची माहिती या वेळी देण्यात आली.

# विद्यार्थ्यांनी संप्रेषण कौशल्य, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे महत्त्वाचे -मनोज गावंड

**उरण : प्रतिनिधी**



रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय येथील प्लेसमेंट व करिअर मार्गदर्शन कक्षाच्या वतीने विद्यार्थ्यांना बंदर व लॉजिस्टिक्स क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी करिअर मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते पी.एस.ए मुंबईचे उपाध्यक्ष मनोज गावंड यांनी आपल्या सादरीकरणात पीएसएमध्ये उपलब्ध नोकरीच्या संधी, पदे, भरती प्रक्रिया व कंपनीतील अंतर्गत पदोन्नती प्रणाली याविषयी सविस्तर माहिती दिली. आपल्या परिसरात वाढणाऱ्या उद्योग आणि बंदर क्षेत्रातील नोकरीच्या नव्या संधींबाबत माहिती दिली तसेच, विद्यार्थ्यांनी संप्रेषण कौशल्य, जुळवून घेण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. आमोद ठक्कर यांनी अध्यक्षीय सांगितले की, मनोज गावंड हे वीर वाजेकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी श्री. गावंड यांच्या यशाचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनी त्यांच्यासारखी प्रेरणा घेण्याचे आवाहन केले तसेच उत्कृष्ट शिक्षणा बरोबरच विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास संभाषण कौशल्य व मुलाखत देण्यासाठी आवश्यक आत्मविश्वास आणि त्या संधींसाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पीएसए टीमसोबत प्रश्नोत्तर सत्रात भाग घेतला आणि करिअरविषयक अनेक महत्त्वाचे मुद्दे समजून घेतले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य, सुधीर घरत पी.एस.ए.च्या सहाय्यक व्यवस्थापक रुपाली कापडे आणि पी.एस.ए.चे कार्यकारी अधिकारी अभिजित पुरव हे उपस्थित होते.

# गाडीची काच फोडून पाच लाखांची रोकड लंपास

## पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर घडलेली घटना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबईत छोट्या मोठ्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. चोरटे एवढे निर्ढावले आहेत की, पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या एका गाडीची काच फोडून आतील पाच लाख रुपयांची रोकड चोरी झाली आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी मुंबईत सराईत चोर तसेच भुरट्या चोरीचे प्रमाणात वाढ झाली आहे. याची गंभीरपणे दखल घेत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अशा चोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथकाची स्थापना केली आहे. या पथकाची स्थापना करून अवघा आठवडा हि उलटला नाही तोच वाशी पोलीस ठाण्यापासून ५० फुटांच्या अंतरावर वर्दळीच्या रस्त्यात चोरीची घटना घडली आहे.

शनिवारी संध्याकाळी पावणे सात वाजता व्यवसायाने वकील असलेले शुभेन्दू पटनाईक यांनी वाशी पोलीस ठाणे नजीक नवी मुंबई स्पॉट्स असोसिएशन समोर कार पार्क केली. काही वेळाने या ठिकाणी दुचाकीवर दोन व्यक्ती आले त्यांनी गाडीच्या मागची काच फोडून आतील पाच लाखांची रोकड चोरी करून पलायन केले. पटनाईक काम संपवून गाडीजवळ आल्यावर त्यांना फुटलेली काच दिसली व चोरीचा प्रकार उजेडात आला. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात अनोळखी दोन व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नवी मुंबईतील ८० शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**



१६ जून रोजी शाळा सुरू होत असल्याने नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करुन महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या ८० शाळांमध्ये 'चला – शाळेत जाऊया!' म्हणत प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. सर्व ठिकाणी उत्साही वातावरणात मान्यवरांसह शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी प्रवेशोत्सवाचा आनंद व्यक्त केला.

नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नेरुळगाव येथील नमुंमपा शाळा क्रमांक १० येथे शाळा प्रवेशोत्सव समारंभास उपस्थित राहून गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी लेझीमच्या तालावर ढोलताशांच्या गजरात प्रवेशव्दारापासून शाळेच्या इमारतीपर्यंत नवागत विद्यार्थ्यांना मिरवणूकीव्दारे वाजत गाजत आणून त्याठिकाणी त्यांचे औक्षण करण्यात आले. यावेळी नवागत विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे कागदावर उमटवून त्यांचे शाळेतील पहिले पाऊल संग्रहीत करण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. त्याचसोबत पहिली ते आठवीच्या मुलांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. नेरूळ शाळेच्या आवारात आयुक्त महोदयांच्या हस्ते तसेच इतर शाळांमध्येही मान्यवरांच्या व विद्यार्थी, पालकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या १२ मार्च २०२५ रोजीच्या पत्रानुसार यावर्षीच्या शालेय वर्ष आरंभाच्या पहिल्या दिवशी महानगरपालिकेच्या सर्व ८० शाळांमध्ये अत्यंत उत्साहात विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. याकरीता शिक्षण विभागामार्फत कोणत्या शाळेत महानगरपालिकेचे कोणते अधिकारी उपस्थित राहणार याचे बारकाईने नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी नमुंमपा शाळा क्र. ९२ कुकशेत येथे तसेच अतिरिक्त आयुक्त डॉ. राहूल गेठे यांनी नमुंमपा शाळा क्र. १ बेलापूर येथे उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे यांनी केलेल्या नियोजनानुसार सर्व विभागप्रमुख, अधिकारी यांनी आपल्याला नेमून दिलेल्या शाळेमध्ये प्रवेशोत्सव समारंभाला प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे आनंदाने स्वागत केले.

विद्यार्थ्यांच्या स्वागताकरिता शाळांमध्ये नानाविध गोष्टी करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये गुलाबाची फुले, चॉकलेट व्यवस्था सजावट, शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन, सेल्फी पॉईंट, ढोलताशांच्या गजरामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत, पुस्तकाची पालखी असा साजरा करण्यात आला.

# माजी विद्यार्थी संघातर्फे वृक्षारोपण




**उरण : बातमीदार, वार्ताहर**

फुंडे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

स्वा. वीर सावरकर माध्यमिक व ज्युनियर कॉलेज नवीन शेवे येथे व तु. ह.वाजेकर माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज फुंडे येथे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष व जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, स्वा. वीर सावरकर विद्यालय नवीन शेवे सचिव जगजीवन भोईर, प्राचार्य संतोष म्हात्रे, प्राचार्य बबन साळुंखे, प्र–प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. झाडे लावा, झाडे जगवा या महाराष्ट्र शासन मिशन योजनेचा भाग म्हणून दरवर्षी फुंडे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी संघ वृक्षारोपण करीत असतात.

या वेळी प्रा.राम गोसावी, प्रा.माने, प्रा.खेडकर तसेच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.



**पनवेल : महापालिकेच्या गुजराती प्राथमिक शाळा क्रमांक ९ येथे विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास माजी नगरसेविका दर्शना भोईर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. रेहाना उपस्थित होते. सर्वांनी नवागतांचे स्वागत व मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली त्रिवेदी यांनी मान्यवरांना तुळशीचे रोप देऊन माभार मानले. सहशिक्षिका डिंपल ठक्कर, श्वेता मरगज, मौसमी घोडके आदी उपस्थित होते.**

# मृतदेह गुंडाळण्यासाठी पैसे घेणारा कामगार बडतर्फ

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

मुलीचा मृतदेह सफेद कपड्यात गुंडाळून देण्यासाठी कंत्राटी कामगाराने मृताच्या नातेवाईकांकडून दोन हजार रुपये घेतल्याचा प्रकार नवी मुंबई महापालिकेच्या वाशी येथील रुग्णालयात घडला. या प्रकरणी कंत्राटी कामगाराला सहा महिन्यांसाठी कामावरून काढून टाकण्यात आले आहे, अशी माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी दिली. भास्कर धामस्कर असे या कामगाराचे नावे असून तो मे. कल्पतरू हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट सर्व्हिस या एजन्सीचा कामगार आहे.

एका दुर्घटनेत मृत पावलेल्या २३ वर्षीय तरुणीचा मृतदेह वाशी रुग्णालयातील शवागृहात ठेवण्यात आला होता. तिचे पालक मृतदेह घेण्यासाठी आले असता शवागृहातील एका कामगाराने मृतदेह व्यवस्थित कापडामध्ये गुंडाळून देण्यासाठी दोन हजार रुपये घेतले. हा प्रकार रुग्णालयाच्या कॅमेऱ्यात कैद झाला. याप्रकरणी मृताच्या नातेवाईकांनी संबंधित कामगारावर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानुसार आज ही कारवाई करण्यात आली.

दरम्यान, या प्रकरणी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजेश म्हात्रे यांची भेट घेतली तसेच या घटनेच्या निषेधार्थ मृतदेह गुंडाळण्यासाठीचे मांजरपाट कापड म्हात्रे यांच्या गळ्यात घालून त्यांचा सत्कार करण्यात आला. येथील आरोग्य सुविधा आणि बेशिस्त कर्मचारी आणि कंत्राटी कामगार यांच्यावर प्रशासनाचा कोणताही वचक नसल्याबद्दल निषेध व्यक्त केला.

## निवडक

### उतेखोलवाडी शाळेत प्रवेशोत्सव



**माणगाव :** रायगड जिल्हा परिषद पीएमश्री शाळा उतेखोलवाडीमध्ये शासन निर्णयानुसार प्रवेशोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व आनंददायी वातावरणामध्ये राबविण्यात आला. सर्वप्रथम मुलांची प्रभात फेरी काढणेत आली. इयत्ता पहिलीच्या मुलांची स्वागत पाऊले उठून औक्षणकरून करून करण्यात आले. शासन उपक्रमानुसार पाठयपुस्तके, गणवेश वाटप करणेत आले. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर आणि पालकांचा शाळेतर्फे सन्मान करण्यात आला. या वेळी शाळा व्यवस्थापन आणि शिक्षकवर्ग याच्या प्रेरनेतून शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम आनंदी वातावरणात व उत्साहात झाला.



**नागोठणे : शिवसेना नेते मनोहर सुटे यांना वाढदिवसानिमित्त पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, भाजप माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, पत्रकार शामकांत नेरपगार यांनी शुभेच्छा दिल्या.**



**माणगाव : शहरात बामणोली रोड परिसरात असणाऱ्या रायगड शिक्षण संस्था संचलित भास्करदादा कामेरकर विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संतोष कामेरकर, सचिव निष्कल कामेरकर, शाळेचे मुख्याध्यापक अविनाश पाटील तसेच शिक्षण संस्थेतील कर्मचारी आदी उपस्थित होते.**

# खंडित वीजपुरवठ्याने पालीतील नागरिक हैराण

## पाणी बंद, पंप नादुरूस्त

### नगरपंचायतीचे वीज वितरण कंपनीला निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

सुधागडसह पाली शहरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. आणि यामुळे पालीकरांना सुरळीत पाणीपुरवठा करता येत नाही तसेच वारंवार वीज गेल्याने पंपदेखील नादुरुस्त होतात. शिवाय नागरिकांचे देखील हाल होतात. त्यामुळे पाली नगरपंचायतने वीज वितरण कंपनीला निवेदनाद्वारे वीज खंडित न करण्याचे आवाहन केले आहे. नुकतेच पाली नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष व सभापती आणि नगरसेवक यांनी पाली विज उपअभियंता यांना निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, पाली नगरपचांयत हद्दीतील विज कोणत्याही प्रकारची सुचना न देता घालण्यात येते, याबाबत वीज वितरण कार्यालयाकडे तोंडी स्वरुपात व लेखी स्वरुपात कळवून सुद्धा आपण वीजपुरवठा बंद करीत आहात. तसेच वीज नसल्याने पाण्याचे पंप बंद होतात व पाण्याच्या साठवण टाकी पर्यंत पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे पालीतील नागरिकांना पुरेसे पाणी देता येत नाही. त्याचप्रमाणे जॅकवेल येथील पंप नादुरुस्त होतात, तसेच कटआऊट उडतात व डीओ पडतात. तरी त्याचा मोठ्या



प्रमाणात खर्चदेखील येतो, असे खर्च सतत करणे नगरपंचायत कार्यालयास परवडणारा नाही. तसेच वीज नसलीतरी विज बिले ही नेहमीप्रमाणेच असतात. तरी हे सतत चालू राहील्यास होणाऱ्या नागरीकांच्या आक्रोशास सर्वस्वी आपण म्हणजेच महावितरण कंपनी, पाली आपण जबाबदार असाल, असे नमूद करण्यात आले आहे.

निवेदन देतेवेळी नगराध्यक्षा प्रणाली शेळके, उपनगराध्यक्ष अरिफ मनियार, सभापती प्रितीजा जोशी, सुलतान बेनसेकर, प्रतिक्षा पालांडे, नगरसेवक आशिक मनियार, सुधिर भालेराव, पराग मेहता, सुधाकर मोरे, नगरसेविका नलिनी म्हात्रे, जुईली ठोंबरे व कल्याणी दपके, तसेच सामाजिक कार्यकर्ते सुबोध पालांडे व संजय म्हात्रे आदी उपस्थित होते.

## नांदगाव हायस्कूलमध्ये शालेय विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथील इयत्ता पाचवी ते आठवी मधील सुमारे ४११ शालेय विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण व या शाळेत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्प गुच्छ देऊन करण्यात आले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तक वाटप होणार असल्याने असंख्य विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. या शाळेचे मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी भरत चव्हाण दत्तात्रय खुळपे, रवींद्र ढोले, सागर राऊत, योगेश पाटील, महेश वाडकर, राहील घलते, नियती ठमके,शिल्पा कळके, निशा बिरवाडकर, राजश्री घाडगे, शेडगे मॅडम, सिद्धार्थ काकनाटे, अमर दरणे आदी मान्यवर शिक्षक या वेळी उपस्थित होते. या वेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप केल्यानंतर नवीनच या शाळेत प्रवेश घेतलेल्या



शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

या वेळी शालेय पुस्तके जपून वापरून त्यावर कव्हर टाकून पुस्तके चांगल्या पद्धतीने वापरून पुस्तकांचा सदुपयोग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. या शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागल्याने यंदा या शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. उत्कृष्ट शिक्षक वृंद असल्याने येथील निकाल खूप चांगला लागत असून पालकाचा ओढा या शाळेकडे असतो. पंचक्रोशी विभागात या शाळेचे नावलौकिक असून ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संखेने प्रवेश घेत आहेत.

## शिक्षण देशाला मजबूत करते -आमदार थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**


शिक्षण हे देशाला मजबूत करीत असते. शिक्षण हे बीज असून त्यापासून तयार होणारे रोपटे हे खऱ्या अर्थाने विकास घडवून आणते. शिक्षणामुळे देश मजबूत होत असून आज माझ्या मतदारसंघात असलेली जी शाळा राज्यात नाव लौकीक असल्याने याचा मला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.



राज्य सरकाच्या माध्यमातून राबवण्यात येत असलेल्या शाळा प्रवेशोत्सव स्मारंभाचे आयोजन मुखमंत्री माझी शाळा सुंदर शाळा म्हणून २०२३-२०२४ मध्ये राज्यस्तरीय द्रितीय क्रमांक पटकावणाऱ्या तालुक्यातील हेदवली शाळेत करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेंद्र थोरवे, गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे, युवा सेनेचे प्रसाद थोरवे, तालुका सचिव अंकुश दाभणे आदी उपस्थित होते. या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले.

या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या, पुस्तके व शालेय साहितत्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देखील यावेळी लेझीम प्रकारातील खेळाचे प्रात्यक्षिक सादर करून दाखवली. त्यानंतर शाळेच्या परिसरात आमदार थोरवे यांच्या हस्ते झाडांची लागवड देखील करण्यात आली असून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प विद्यार्थी व शिक्षकांनी केला. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खुटील आणि सापे येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप



**माणगाव : बातमीदार**

महाड तालुक्यातील खुटील आ. वाडीमधील अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना छत्री, पाटी इ. साहित्यांचे १६ जून रोजी वाटप करण्यात आले. माणगांव तालुक्यातील दानशूर व्यक्तीमत्व असलेल्या छाया तेटगुरे यांनी १७ विद्यार्थ्यांना छत्री वाटप केलेले आहे. तसेच महाड तालुक्यातील दानशूर व्यक्ती सयाजी तांबे यांनी १७ विद्यार्थ्यांना पाटी वाटप केले.

सापे या गावी ५० विद्यार्थीना दानशूर व्यक्ती प्रकाश वसंत पेडणेकर (घाटकोपर) यांनी छत्री वाटप केलेले आहे. मुंबई मधून छत्री गावी पाठविण्याकरिता स्वाती कीर, संदीप पाटणे यांनी खुप मेहनत घेतली. या कार्यक्रमाची पूर्व तयारी खुटील येथील अंगणवाडी सेविका दर्शना धाडवे तसेच सापे येथील अंगणवाडी सेविका वृषाली आंग्रे, मदतनीस वैशाली सुकूम यांनी केली. दानशूर व्यक्तींच्या बाबतीत माहिती देऊन आम्ही केवळ वाहक असल्याचे कार्यक्रमाचे संयोजक अशोक सकपाळ यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रमुख महेश मोरे सामाजिक कार्यकर्ते यांनी उपस्थितांना शिक्षणाचे महत्त्व, तंत्रज्ञान आणि कला याची सांगड कशी घालता येईल यावर मनोगत व्यक्त केले. श्री. पेडणेकर, छाया तेटगुरे, सयाजी तांबे यांच्या दानशूरतेला सलाम असेच कार्य यांच्या हातून व्हावेत या करिता त्यांना मनपूर्वक धन्यवाद दिले.

या कार्यक्रमास खुटीलचे सरपंच वाघमारे, सापे सरपंच रिंकल सुकूम, पो. पा. ज्ञानदेव सुकूम, रामचंद्र आंग्रे, पांडुरंग साळवी, अविनाश धाडवे, सिमाताई आंग्रे व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## रेवदंड्यातील सुमित्र पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सुमित्र ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, रेवदंडाची २९वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी आयोजीत करण्यात आली होती.

रेवदंडा मोठे बंदर येथील भंडारी हितवर्धक मंडळ, चौल-रेवदंडा समाज सभागृहात विद्यमान सुमित्र ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, रेवदंडाची २९वी वार्षिक सर्वसाधारण सभा पतसंस्थेचे अध्यक्ष कमळाकर गोविंद साखळे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या वेळी उपाध्यक्ष खलिद युनूस तांडेल, संचालक महेंद्र कमळाकर नाईक, उमेश रामचंद्र कोंडे, राजन सदाशिव वाडकर, अशोक जाया हवालदार, विजय सखाराम चौलकर, सदानंद शंकर घरत, संचालिका प्रतिभा शरद वरसोलकर, कमरजब्बीन मुज्ञफर मुकादम, हेमांगी अभिजित साखळे, तज्ञ संचालक अनीस अब्बू सत्तार हाजते, तज्ञ संचालिका प्रतिभा प्रकाश सुर्वे, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक नागावकर यांची उपस्थिती व्यासपिठावर होती. तसेच भंडारी समाज अध्यक्ष सुरेश खोत, उपाध्यक्ष प्रशांत जाधव, जेष्ठ सदस्य व सल्लागार हेमंत जनार्दन गणपत, ज्येष्ठ सदस्य शरद वरसोलकर, लोकसेवा सोसायटी सेक्रेटरी रमाकांत घोसाळकर आदी मान्यवरांसह पतसंस्थेचे सभासदाची उपस्थिती होती.

पतसंस्थेची वार्षिक सभा यशस्वीपणे पार पडण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक नागावकर, व्यवस्थापक क्रांती प्रशांत जाधव, रोखपाल नरेश काशिनाथ सुर्वे तसेच अल्पेश कृष्णा घरत, निलेश विश्वनाथ भट्टीकर, विजय शंकर टेकाळकर यांनी परिश्रम घेतले.



## केटीएसपी मंडळाचा भोंगळ कारभार; भाजपचा हल्लाबोल

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या भोंगळ कारभाराविरोधात भाजपने आक्रमक पवित्रा घेतला आहे. भाजपचे नेते यशवंत साबळे यांच्या नेतृत्वाखाली भाजप पदाधिकाऱ्यांनी मंडळाचे संचालक आणि मुख्याध्यापिका यांना धारेवर धरत प्रश्नांची सरबत्ती केली. शाळा सुरू होऊनही नवीन वर्गांचे काम अपूर्ण असल्याने विद्यार्थ्यांच्या बसण्याच्या सोयीपासून ते कामाच्या सुरक्षिततेपर्यंत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करत भाजप कार्यकर्त्यांनी संचालक मंडळावर जोरदार शरसंधान साधले.



भाजपच्या शिष्टमंडळाने विचारले की, शाळा सुरू होऊनही नवीन वर्गाचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने, विद्यार्थ्यांच्या बसण्याची सोय कुठे करणार? सुरू असलेल्या कामाबद्दल आणि त्यांच्या सुरक्षिततेबद्दल काय उपाययोजना केल्या आहेत? तसेच यापूर्वीच्या शाळांचे काम अर्धवट ठेवणाऱ्या ठेकेदारालाच पुन्हा काम देण्यामागे संचालक मंडळाचा काय उद्देश आहे, असे अनेक प्रश्न उपस्थित करत भाजप कार्यकर्त्यांनी संचालक मंडळाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

सध्या जुन्या इमारतीवर नवीन वर्ग बांधण्याचे काम सुरू आहे. या संदर्भात साबळे यांनी जुन्या इमारतीला नवीन कामाचा भार झेलण्याची क्षमता आहे का, याची तपासणी केली आहे का, असा सवाल केला. यशवंत साबळे यांनी आक्रमकपणे या इमारतीच्या बांधकामाची परवानगी आणि स्ट्रक्चरल ऑडिटची मागणी केली. त्यांनी दोन दिवसांत यासंबंधीचा अहवाल भाजपला देण्याची जोरदार मागणी केली.

जर या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत, तर भाजपच्या वतीने शाळेसमोर जाहीर उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला. या वेळी माजी शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, इंदरमल खंडेलवाल, महिला शहराध्यक्षा अश्विनी अत्रे यांच्यासह भाजपचे इतर शहर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## वडगाव शाळेत नवागतांचे स्वागत

**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा पुरस्कार प्राप्त वडगांव शाळेत खालापूर गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि शाळेने केलेल्या स्वागताच्या कार्याची प्रशंसा केली.

शाळा प्रवेश उत्सव २०२५-२६च्या प्रथम दिवशी संपूर्ण कोकणातून माझी मुख्यमंत्री शाळा पुरस्कार प्राप्त वडगांव शाळेत खालापूर पंचायत समिती गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी विद्यार्थी यांच्या स्वागताची केलेली तयारी पाहून प्रशंसा केली. शाळेचा



पहिला दिवस हा प्रवेशोत्सव दिन म्हणून साजरा करण्यात आला. शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ, फुगे व चॉकलेट देऊन करण्यात आले.

माझे पहिले पाऊल अंतर्गत पहिलीतील विद्यार्थ्यांच्या पाऊलाचे ठसे कागदावर घेण्यात येऊन त्याची एक प्रत पालकांना देण्यात आली. गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी प्रत्येक विद्यार्थी यांच्या बरोबर पालकांशीदेखील संवाद साधला.

विद्यार्थ्यांची गावातून ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. यावर्षीपासून सी.बी.एस.ई. पॅटर्न इयत्ता पहिली पासून सुरू झालेला आहे त्याबद्दल उपस्थित पालकांनी समाधान व्यक्त केले. पुन्हा वडगांव शाळेत प्रवेश घेणे म्हणजे येथील मुख्याध्यापक व त्यांच्या सहकारी शिक्षक यांची मेहनत आहे, असे गौरव उदगार गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी काढले.

या वेळी विस्तार अधिकारी चांदोरकर, ग्राम पंचायत अधिकारी सुहास वारे, शिक्षण समिती अध्यक्ष राजश्री नरेंद्र जांभुळकर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते.

## आदिवासी कुटुंबांना अडीच हजार कलमी आंब्याची रोपे वाटप

**पेण : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील बोरगाव ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील तांबडी, उंबरमाळ, खवसावाडी, काजूवाडी आणि केळीची येथील १४६ आदिवासी कुटुंबांना कलमी पर्यावरण संवर्धनासह, आदिवासी बांधवांच्या रोजगार वृद्धीसाठी टी.सी.एस. आर.डी. मिठापूर, रॅलीज इंडिया आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने दोन हजार पाचशे कलमी आंब्याच्या रोपांचे वाटप करण्यात आले.

या पाचही वाड्यांमध्ये टीसीआरडी, रॅलीज इंडिया यांच्या वतीने उन्नत ग्राम प्रकल्प राबविले जात असून टाटा रॅलीचे तांत्रिक सल्लागार श्रीकांत म्हात्रे, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर ग्राम संवर्धनचे कार्यकर्ते राजू पाटील, सचिन पाटील, सरिता पाटील व राजेश रसाळ यांनी सदर झाडांचे वाटप केले आहे.

विशेष म्हणजे पाचवी वाड्यांमध्ये पाण्याची मोठ्या प्रमाणात दुर्भिक्ष असतानाही येथील आदिवासी बांधव डोक्यावरून पाणी वाहून या झाडांचे संगोपन करत



आहे. त्यामुळे मागील मागील तीन वर्षांत ५५०० रोपांची लागवड करून सरासरी नव्वद टक्के झाडे जगविण्यात यश. मिळाल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.

# इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाच्या प्लेइंग ११ची उत्सुकता

**लंडन : वृत्तसंस्था**

शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय कसोटी संघ इंग्लंड दौऱ्यावर आहे, जिथे त्यांना यजमान इंग्लंड संघाविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या मालिकेतील पहिला सामना २० जूनपासून लीड्स येथील हेडिंग्ले क्रिकेट ग्राउंडवर रंगणार आहे. या सामन्यासाठी भारतीय खेळाडू इंग्लंडच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत असून जोरदार सराव करत आहेत.



लीड्स कसोटीसाठी भारतीय संघाची अंतिम ११ खेळाडूंची निवड चाहत्यांसाठी उत्सुकतेचा विषय आहे. या पहिल्या कसोटीत अनुभवी केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांच्याकडून सलामीची अपेक्षा आहे. राहुल-जैस्वाल जोडीमुळे लेफ्टी-राईटी फलंदाजीच्या कॉम्बिनेशनचा फायदा मिळेल. दुसरीकडे नवा कर्णधार शुभमन गिल चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करू शकतो. गिलने अलीकडच्या काळात तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी केली आहे, परंतु विराट कोहलीच्या निवृत्तीनंतर त्याचे चौथ्या स्थानावर स्थलांतर होऊ शकते.

पाचव्या क्रमांकावर यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत आणि सहाव्या क्रमांकावर अष्टपैलू रवींद्र जडेजा खेळताना दिसू शकतात, तर अष्टपैलू नितीश रेड्डीला शार्दुल ठाकूरऐवजी प्राधान्य मिळू दिले जाण्याची दाट शक्यता आहे. तो सातव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी येऊ शकतो. नितीशने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आपल्या पदार्पणाच्या कसोटी मालिकेतही सातव्या क्रमांकावर खेळून उत्तम कामगिरी केली होती. दुसरीकडे शार्दुल ठाकूरने इंट्रा स्क्वॉड सामन्यात शतकी खेळी केली असली तरी त्याला कदाचित लीड्स कसोटीत बाहेर बसावे लागू शकते.

वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांचा अंतिम ११मध्ये समावेश जवळपास निश्चित आहे. फिरकी गोलंदाज म्हणून चायनामन कुलदीप यादवला संधी मिळू शकते, पण त्याला भारतीय उपखंडाबाहेर कसोटी खेळण्याचा अनुभव कमी असून हीच बाब त्याच्यासाठी नकारात्मक ठरू शकते, मात्र कोणत्याही खेळपट्टीवर गोलंदाजीला फिरकी देण्याची त्याच्याकडे क्षमता आहे.

### नायरची मजबूत दावेदारी

शुबमन गिल चौथ्या क्रमांकावर खेळल्यास तिसऱ्या क्रमांकाची जागा रिकामी राहील. ज्यासाठी साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन आणि करुण नायर हे दावेदार आहेत. या तिघांमध्ये नायरचा दावा सर्वात मजबूत मानला जात आहे. त्याचे तब्बल आठ वर्षांनी कसोटी संघात पुनरागमन झाले आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनीही नायरला लीड्स कसोटीत संधी मिळण्याचे संकेत दिले होते.

### प्रसिद्ध की अर्शदीप?

प्रसिद्ध कृष्णा आणि अर्शदीप सिंह यांच्यापैकी कोणाला संधी मिळेल हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. अर्शदीपच्या निवडीमुळे संघाला डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचा पर्याय मिळेल. अर्शदीपने अद्याप कसोटी पदार्पण केलेले नाही, पण त्याला व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये संघासाठी खेळण्याचा अनुभव आहे.

# लहान देशांसाठी चार दिवसांच्या कसोटीचा विचार

## आयसीसी अध्यक्ष जय शाह यांचे संकेत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मागील काही वर्षे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमुळे कसोटी क्रिकेटला पुन्हा एकदा प्रचंड लोकप्रियता लाभली आहे. आता ही स्पर्धा अधिक थरारक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) २०२७-२९च्या डब्ल्यूटीसी स्पर्धेत लहान देशांसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना मान्यता देण्याचा विचारात आहे. याबाबत आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी नुकतीच आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

'द गार्डियन'ने दिलेल्या वृत्तानुसार, मागील आठवड्यात लॉर्ड्स येथे डब्ल्यूटीसी स्पर्धेतील अंतिम सामना खेळवला गेला. या वेळी झालेल्या चर्चेदरम्यान आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी २०२७-२९च्या स्पर्धेत



चार दिवसांच्या कसोटी सामन्यावर चर्चा केली. वेळ आणि खर्चामुळे अनेक लहान देश कसोटी सामन्यांचे आयोजन करण्यास टाळाटाळ करतात, परंतु चार दिवसांच्या क्रिकेटकडे वाटचाल केल्याने संपूर्ण तीन कसोटी मालिका तीन आठवड्यांपेक्षा कमी वेळात खेळता येईल. यासाठीचा नवा नियम बनवता येतील, असेही शाह यांनी सांगितले.

इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि भारत यांना अजूनही ॲशेस, बॉर्डर-गावसकर ट्रॉफी आणि अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीसाठी पाच दिवसांच्या कसोटी मालिकेत खेळण्याची परवानगी असेल, असेही शाह यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी मालिका २० जूनपासून हेडिंग्ले येथे इंग्लंड आणि भारत यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याने सुरू होणार आहे.

रिपोर्टनुसार चार दिवसांच्या कसोटी सामन्यांमुळे एक दिवस कमी होईल तसेच वेळेचा अपव्यय कमी करण्यासाठी एका दिवसातील खेळण्याचा वेळ दररोज किमान ९८ षटके टाकण्यात यावीत, असाही नियम करण्याचा विचार सुरू आहे. सध्याच्या पाच दिवसांच्या कसोटी सामन्यात एका दिवसात जास्तीत जास्त ९० षटके टाकली जातात.

# भारतीय अंडर-१९ संघातील दोन खेळाडू जखमी

## बीसीसीआयकडून बदली खेळाडूंची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

१९ वर्षांखालील भारतीय संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर आहे, जो हा युवा संघ २४ जून रोजी १९ वर्षांखालील यजमान संघाविरुद्ध पहिला सामना खेळणार आहे, पण या दौऱ्यापूर्वी भारतीय संघातील दोन खेळाडू जखमी झाले आहेत. यात आदित्य राणा आणि खिलन पटेल यांचा समावेश आहे.

दरम्यान, दोन्ही जखमी खेळाडू इंग्लंड दौऱ्यातून बाहेर पडले आहेत. बीसीसीआयने त्यांच्या जागी डी दीपेश आणि नमन पुष्पक यांचा संघात समावेश केला आहे. ते दौऱ्यासाठी स्टँडबाय



खेळाडूंच्या यादीत समाविष्ट होते.

बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे सुरू असलेल्या हाय परफॉर्मन्स कॅम्प दरम्यान आदित्यला पाठीच्या खालच्या भागात स्ट्रेस फ्रॅक्चर झाला, तर खिलनला उजव्या पायात समस्या आहे. अशा परिस्थितीत बीसीसीआयला दोन्ही खेळाडूंच्या जागी बदली खेळाडूंची घोषणा करावी लागली आहे.

बीसीसीआयने २२ मे रोजीच इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय अंडर-१९ संघाची घोषणा केली होती. आयपीएल २०२५मध्ये बॅटने धुमाकूळ घालणाऱ्या वैभव सूर्यवंशीचाही संघात समावेश करण्यात आला होता. आता दौरा सुरू होण्याच्या काही दिवस आधी संघात बदल करण्यात आले आहेत. भारताच्या गोलंदाजी आक्रमणात प्रणव राघवेंद्रसारखे गोलंदाज आहेत, ज्याने बंगळुरू येथील एनसीए कॅम्प दरम्यान १४७ किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी करून प्रसिद्धी मिळवली होती.

**संघ** : आयुष म्हात्रे (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा, मौल्यराजसिंह चावडा, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (उपकर्णधार आणि यष्टीरक्षक), हरवंश सिंह (यष्टीरक्षक), आर.एस. अंबरीश, कनिष्क चौहान, हेनिल पटेल, युधाजीत गुहा, प्रणव राघवेंद्र, मोहम्मद एनान, अनमोलजीत सिंह, डी. दीपेश, नमन पुष्पक.

# दिग्वेश राठीचे पाच चेंडूत पाच बळी

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयापीएल २०२५मध्ये आपल्या धारदार गोलंदाजीसाठी आणि अनोख्या सेलिब्रेशनने प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या दिग्वेश राठीने एका टी-२० सामन्यात चमत्कार केला आहे. लखनऊ सुपर जायंट्सचा युवा फिरकी गोलंदाज दिग्वेशने स्थानिक सामन्यात सलग पाच चेंडूत पाच गडी बाद केले. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

दिग्वेश राठीने फक्त एका षटकात अर्ध्या संघाला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यापूर्वी श्रीलंकेच्या लसिथ मलिंगाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये चार चेंडूत चार बळी घेतले होते.

# महिलांच्या वनडे क्रमवारीत स्मृती मानधना अव्वल स्थानी

**दुबई : वृत्तसंस्था**

नॅशनल क्रश अन् भारतीय महिला संघाची उपकर्णधार आयसीसीच्या महिला एकदिवसीय क्रमवारीत पुन्हा एकदा नंबर वन ठरली आहे. मंगळवारी आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या क्रमवारीत स्मृतीला २०१९नंतर पहिल्यांदा नंबर वनचा मुकूट मिळाला आहे.



आयसीसी महिला एकदिवसीय क्रमावारीत मागील सहा महिन्यांपासून दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वार्ट अव्वलस्थानावर कब्जा करून बसली होती.

# अहमदाबाद विमान अपघातात युवा क्रिकेटपटूचा मृत्यू

## टीमने वाहिली श्रद्धांजली

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अहमदाबाद झालेल्या भीषण विमान अपघाताच्या दुर्घटनेने संपूर्ण जगाला हादरवून सोडले. या विमान अपघातात एका २३ वर्षीय क्रिकेटपटूचाही मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

मृत्युमुखी पडलेल्या २७५ जणांमध्ये क्रिकेटपटू दीर्घ पटेल याचाही समावेश होता. त्याने हडर्सफील्ड विद्यापीठात शिक्षण घेतले तसेच आर्टिफिशियल इंटेलिजेंसमध्ये एमएससी पूर्ण केले होते.


बीबीसी आणि एअरडेल अँड व्हार्फेडेल सीनियर क्रिकेट लीगनुसार दीर्घ पटेल अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या विमानाच्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या



२४१ प्रवाशांपैकी एक होता. २०२४मध्ये दीर्घ हा लीड्स मॉडर्नियन्स सीसीचा खेळाडू होता. त्याने २० सामन्यांमध्ये ३१२ धावा केल्या आणि २९ विकेट्स घेतल्या होत्या. त्याच्या निधनाची बातमी ऐकून क्लबलाही दुःख झाले आहे.

मूळचा गुजरातचा रहिवासी असलेला दीर्घ पटेलचा नवीन नोकरीत स्थिरावल्यानंतरही खेळण्याचा मानस होता, असे एअरडेल अँड व्हार्फेडेल सीनियर क्रिकेट लीगच्या प्रवक्त्यांनी सांगितले.







KGP
KAMAL GAURI HIRU PATIL SHIKSHAN SANSTHA
ADMISSIONS OPEN FOR 2025-2026

Balasaheb Thackeray Law College
B.A. LL.B, LL.B, LL.M
Affiliated to Mumbai University & Approved by Bar Council of India
+91 98216 93332



B.K. Patil College of Pharmacy (Babandada Patil)
D. Pharmacy | B. Pharmacy
Affiliated to Mumbai University, MSBTE, AICTE, DTE Approved by Pharmacy Council of India
+91 70214 18122


Babandada Patil College of Nursing
General Nursing and Midwifery (G.N.M)
Affiliated to Maharashtra State Board of Nursing and Paramedical Education
+91 832-9025504

Babandada Patil College of Physiotherapy
Bachelor in Physiotherapy
Affiliated to MUHS & Approved by Maharashtra State Govt.
+91 77386 21364

Sadguru Vamanbaba College of Arts, Commerce & Science
B. Arts, B.Sc, B.Sc IT, B.Com, B.Ms, M.Sc, M.Com
NAAC 'B' Grade
Affiliated to Mumbai University
+91 95945 35370

The Elite Public School & Senior Secondary
Playgroup - 12th Std.
Affiliated to CBSE Board, New Delhi School Code: 30696 Affiliation No: 1130767
+91 98926 52604

The Elite Public School & Junior College
Playgroup - 12th Std.
Recognised by Maharashtra State Govt. Udise No.: 27240817012/27240817020
+91 8424-030442



B.K Patil Junior College
11th - 12th Arts, Commerce & Science
Approved by Maharashtra State Board
+91 98214 88404

2 Mins from Pendhar Metro Station, Taloja

Plot No 29, Sector 11, Opp Taloja Metro Station, Taloja Phase 1, Navi Mumbai
+91 9920306667
+91 9321100100
Plot No 73, Sector 17, Opp Pendar Metro Station, Taloja Phase 2, Navi Mumbai

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com